मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक युवक आधार मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २६३ ■ शनिवार, ०६ जून २०२६ ■ किंमत : २ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514

# शिवराज्याभिषेक दिन : इतिहासातून वर्तमानाला मिळणारी दिशा

६ जून हा दिवस महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णक्षण म्हणून ओळखला जातो. इ.स. १६७४ रोजी रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य राज्याभिषेक झाला आणि हिंदवी स्वराज्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरले.हा केवळ एका राजाचा राज्यारोहण सोहळा नव्हता,तर शतकानुशतके परकीय सत्तेखाली दबलेल्या जनतेच्या स्वाभिमानाचा आणि स्वातंत्र्याच्या आकांक्षेचा विजय होता.छत्रपती शिवाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याची स्थापना केली.त्यांनी रयतेच्या हिताला सर्वोच्च स्थान दिले.न्याय,पारदर्शकता,सुरक्षितता आणि लोककल्याण या तत्त्वांवर त्यांनी शासन उभारले.शेतकरी,कष्टकरी महिला,आणि स्वराज्यातील सर्वसामान्य जनतेचे हित जपणारे प्रशासन ही त्यांच्या राज्याची वैशिष्ट्ये होती.महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून शासनकारभार व्यवस्थित चालत असे.प्रत्येक निर्णयामध्ये जनकल्याणाचा विचार अग्रस्थानी असे. रायगडावरील राज्याभिषेकाने स्वराज्याला वैधानिक मान्यता मिळाली.शिवाजी महाराज छत्रपती झाले आणि मराठी राज्याची ओळख जगभर निर्माण झाली.या घटनेने स्वराज्यातील जनतेमध्ये नवचैतन्य निर्माण केले.स्वराज्य म्हणजे केवळ सत्ता नसून जनतेच्या कल्याणासाठी असलेली जबाबदारी आहे,हा संदेश महाराजांनी दिला.आजच्या काळात शिवराज्याभिषेक दिन साजरा करताना आपण महाराजांच्या विचारांकडे नव्याने पाहण्याची गरज आहे.भ्रष्टाचारमुक्त प्रशासन,लोकाभिमुख शासन,कायद्याचे राज्य,महिलांचा सन्मान,पर्यावरण संरक्षण



आणि सर्वसमावेशक विकास हीच खरी शिवरायांना मानवंदना आणि खरा मुजरा ठरेल.शासन आणि प्रशासनानेही शिवरायांच्या आदर्शांमधून प्रेरणा घेऊन जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देणे आवश्यक आहे.सर्वधर्मसमभाव आणि विकासाची समान संधी या मूल्यांची आज नितांत गरज आहे.शासन यंत्रणेने आणि लोकप्रतिनिधींनी शिवरायांच्या आदर्शांचा अभ्यास करून त्यानुसार कार्य करण्याची आवश्यकता



आहे.सध्याच्या काळात विकासाच्या अनेक योजना राबवल्या जात असल्या तरी सर्वसामान्य नागरिकांना न्याय,सुविधा आणि पारदर्शक सेवा मिळणे हेच खरे सुराज्य आहे.छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या हितासाठी जे तत्त्वज्ञान दिले,त्याचा अवलंब केल्यास प्रशासन अधिक लोकाभिमुख होऊ शकते.नागरिकांनीही आपल्या हक्कांबरोबर कर्तव्यांची जाणीव ठेवून समाजहितासाठी योगदान दिले पाहिजे. आज शिवराज्याभिषेक दिनानिमित्त आपण सर्वांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा जतन करण्याचा संकल्प केला पाहिजे.स्वराज्याच्या प्रेरणेतून सुराज्य घडविण्याची जबाबदारी आपली आहे. समाजातील अन्याय,भ्रष्टाचार,असमानता आणि उदासीनता यांच्याविरुद्ध लढत लोकहिताला प्राधान्य देणे हीच शिवरायांना खरी मानवंदना ठरेल.छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य आजही मार्गदर्शक आहे. त्यांचे शौर्य,दूरदृष्टी,व्यवस्थापन कौशल्य आणि राष्ट्रनिष्ठा प्रत्येक पिढीसाठी प्रेरणादायी आहे.शिवराज्याभिषेक दिन हा केवळ ऐतिहासिक स्मरणाचा दिवस नसून स्वाभिमान,सुशासन आणि राष्ट्रसेवेची प्रेरणा देणारा दिवस आहे.शिवराज्याभिषेक दिन हा केवळ ऐतिहासिक उत्सव नाही,तर स्वराज्याच्या मूल्यांचे स्मरण करून देणारा दिवस आहे.हा दिवस आपल्याला राष्ट्रप्रेम ,स्वाभिमान,त्याग,शौर्य आणि लोकसेवेची प्रेरणा देतो.शिवरायांनी घालून दिलेला आदर्श आजच्या पिढीने समजून घेतला तर समाजात सकारात्मक परिवर्तन घडू शकते.६ जून रोजी आपण सर्वांनी शिवरायांच्या आदर्शांचा वारसा जपत स्वराज्याच्या विचारांना आधुनिक सुराज्याशी जोडण्याचा संकल्प केला पाहिजे.हाच शिवराज्याभिषेक दिनाचा खरा संदेश आणि महाराजांना खरा मुजरा ठरेल.

**केतन द.भोज**
**सदस्य - मराठी वृत्तपत्र लेखक संघ,मुंबई**

# अनिकेतभाई तटकरे यांच्या बिनविरोध निवडीचा श्रीवर्धनमध्ये जल्लोष

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित** : राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी आमदार अनिकेतभाई तटकरे यांची विधानपरिषदेवर बिनविरोध निवड झाल्याची घोषणा होताच श्रीवर्धन शहरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. त्यांच्या निवडीबद्दल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी उत्स्फूर्तपणे आनंदोत्सव साजरा केला.

शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे मोठ्या संख्येने कार्यकर्ते एकत्र आले. यावेळी फटाक्यांची आतषबाजी



करण्यात आली तसेच जोरदार घोषणाबाजी करून आनंद व्यक्त करण्यात आला. "अनिकेतभाई तटकरे यांचा विजय असो" आणि "राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा विजय असो" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कार्यकर्त्यांनी सांगितले की, अनिकेतभाई तटकरे यांच्या नेतृत्वावर पक्षश्रेष्ठींनी पुन्हा एकदा विश्वास दाखवत त्यांना विधानपरिषदेची उमेदवारी दिली आणि त्यांची बिनविरोध निवड झाली. त्यांच्या निवडीमुळे रायगड जिल्ह्यासह श्रीवर्धन तालुक्याच्या विकासाला अधिक गती मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.

या आनंदोत्सव प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, युवक कार्यकर्ते आणि समर्थक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अनिकेतभाई तटकरे यांच्या बिनविरोध निवडीमुळे श्रीवर्धनमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य संचारले आहे.

# पानवडोदचे भूमिपुत्र नरेंद्र पाडळकर यांची सहायक पोलीस आयुक्तपदी पदोन्नती

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी** : छत्रपती संभाजीनगर पोलीस दलात कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक नरेंद्र भि. पाडळकर यांची पदोन्नती होऊन त्यांची सहायक पोलीस आयुक्त (ACP) पदावर नियुक्ती झाली आहे. त्यांच्या प्रदीर्घ, प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष सेवेचा हा शासनाने घेतलेला निर्णय असून, या पदोन्नतीमुळे पोलीस दलासह विविध क्षेत्रांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

मूळचे पानवडोद येथील भूमिपुत्र असलेले नरेंद्र पाडळकर यांनी आपल्या



प्रदीर्घ कार्यकाळात विविध पोलीस ठाणी आणि महत्त्वाच्या विभागांत जबाबदारीने काम केले आहे. गुन्हेगारी नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था राखणे, संवेदनशील प्रकरणांचा प्रभावी तपास आणि नागरिकांशी थेट सुसंवाद यांत त्यांनी विशेष नैपुण्य सिद्ध केले आहे. त्यांच्या कार्यक्षम नेतृत्वाखालील तपासामुळे अनेक गुन्ह्यांचा छडा लागला असून, सामाजिक सलोखा राखण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली आहे.

पाडळकर यांच्या शिस्तप्रिय आणि कर्तव्यदक्ष कार्यशैलीमुळे वरिष्ठ अधिकारी, सहकारी कर्मचारी व नागरिकांमध्ये त्यांच्याबद्दल आदराची भावना आहे. त्यांच्या या पदोन्नतीबद्दल सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आपल्या अनुभवाच्या बळावर ते नवीन पदावर पोलीस दलाची प्रतिमा अधिक उंचावतील आणि जनसेवेचे कार्य अधिक प्रभावीपणे पार पाडतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.




# अपर तहसीलदारांच्या तत्परतेमुळे चिमुकलीचे प्राण वाचले

## अधिकाऱ्यामधला देवमाणूस' अनुभवत कुटुंबीयांची कृतज्ञता व्यक्त

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : शासकीय यंत्रणेतील संवेदनशीलता आणि तत्पर कार्यपद्धतीचे उत्कृष्ट उदाहरण अपर पनवेल तहसील कार्यालयाने नुकतेच घालून दिले आहे. एका गंभीर आजाराने ग्रस्त असलेल्या अवघ्या एक वर्षांच्या चिमुकलीच्या उपचारासाठी आवश्यक असलेला उत्पन्नाचा दाखला एका दिवसात उपलब्ध करून देत अधिकाऱ्यांनी दाखविलेल्या कार्यतत्परतेमुळे तिच्यावर वेळेत शस्त्रक्रिया होऊन तिचे प्राण वाचल्याची हृदयस्पर्शी घटना घडली आहे.

मौजे महोदर, ता. पनवेल येथील रमेश बुधाजी भुकरा यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बेताची आहे. त्यांच्या एक वर्षांच्या कन्या कु. अस्मिता हिला हृदयाला छिद्र असल्याचे निदान झाले होते. डॉक्टरांनी तातडीने शस्त्रक्रिया करण्याचा सल्ला दिला होता. उपचारासाठी विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक असल्याने भुकरा कुटुंब मोठ्या चिंतेत होते. या परिस्थितीत रमेश भुकरा यांचे भाचे समीर पांडुरंग पारधी यांनी पनवेल तहसील कार्यालयात धाव घेतली. त्यांनी अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे व निवासी नायब तहसीलदार संभाजी शेलार यांना संपूर्ण वस्तुस्थिती सांगून उत्पन्नाचा दाखला तातडीने देण्याची विनंती केली.

प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन अपर तहसीलदार जितेंद्र इंगळे यांनी तत्काळ कार्यवाहीचे निर्देश त्यानुसार निवासी नायब तहसीलदार शेलार यांनी अर्जाची त्वरित दखल घेत अवघ्या एका दिवसात उत्पन्नाचा दाखला उपलब्ध करून दिला. दिले. सदरचा दाखला मिळताच तो मुंबईतील वाडिया रुग्णालयात सादर करण्यात आला. त्यामुळे कु. अस्मिता हिच्यावर आवश्यक शस्त्रक्रिया वेळेत आणि यशस्वीरित्या पार पडली. तसेच उपचाराचा आर्थिक भारही मोठ्या प्रमाणात कमी झाला. घटनेनंतर समीर पारधी यांनी तहसील कार्यालयात भेट देऊन संबंधित अधिकाऱ्यांचे आभार मानले. आपल्या भाचीचे प्राण वाचविण्यासाठी मिळालेल्या वेळेवरच्या मदतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करताना त्यांना अश्रू अनावर झाले.

नागरिकांच्या अडचणी समजून घेऊन नियमांच्या चौकटीत राहून केलेली तत्पर मदत हीच खरी लोकसेवा असल्याचे या घटनेतून अधोरेखित झाले आहे. पनवेल तहसील कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या या संवेदनशील व लोकाभिमुख कार्याची परिसरात सर्वत्र प्रशंसा होत आहे.









# शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी प्रहार चे ठिय्या आंदोलन !!

## तीन प्रमुख मागण्यांसाठी सरकारला घेरले !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/अकोला प्रतिनिधी:** शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित आणि गंभीर प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी प्रहार च्या वतीने जिल्हाधिकारीनकार्यालयासमोर दि.०४/०६/२०२६ गुरुवारी तीव्र ठिय्या आंदोलन करण्यात आले.खरीप हंगामाच्या तोंडावर शेतकरी अडचणीत सापडला असताना, प्रशासनाने तातडीने पावले न उचलल्यास आंदोलन आणखी तीव्र करण्याचा इशारा प्रहारच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.



या आंदोलनादरम्यान प्रहार संघटनेने प्रशासनाकडे प्रामुख्याने तीन प्रमुख मागण्या लावून धरल्या आहेत: खतांचा बफर स्टॉक तातडीने मोकळा करावा ,हंगामाच्या काळात अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना खतांची टंचाई जाणवत आहे . खतांचा काळाबाजार थांबवण्यासाठी आणि शेतकऱ्यांना वेळेत, रास्त दरात खत उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने राखीव ठेवलेला बफर स्टॉक तातडीने बाजारात मोकळा करावा, जेणेकरून शेतकऱ्यांची अडवणूक होणार नाही.

अपुऱ्या पावसामुळे किंवा लहरी हवामानामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. पीक विमा कंपन्यांकडून शेतकऱ्यांना वेळेत आणि योग्य भरपाई मिळत नाही. त्यामुळे पीक विम्यातील निकष बदलून, नुकसान भरपाई सुलभ करणारे पूर्वीचे ट्रिगर तातडीने सुरू करण्यात यावेत, जेणेकरून बाधित शेतकऱ्यांना विम्याचा प्रत्यक्ष लाभ मिळेल. त्याच प्रमाणे अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे करून त्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत द्यावी, १ तारखेला झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या फळ पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडचा घास हिरावला गेल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. त्यामुळे बाधित शेतकऱ्या च्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत आणि बाधित शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत जाहीर करावी.

शेतकरी आधीच संकटात आहे, त्यात प्रशासकीय अनास्थेमुळे त्याला आणखी वेठीस धरले जात आहे. जोपर्यंत आमच्या या तीनही प्रमुख मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत प्रहारचा हा लढा थांबणार नाही. असा इशारा प्रहार पदाधिकारी यांनी दिला आहे. या आंदोलनात प्रहार कार्यकर्ते आणि शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माहिती अधिकार कायद्याच्या ग्रहणासाठी उपोषण

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** माहिती अधिकारी कायदा खूप चांगला आहे मात्र अधिकाऱ्यांनी योग्य आणि परिपूर्ण माहिती वेळेत दिली तर त्याचा फायदा उपेक्षित वर्गाला होतो. मात्र अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारामुळे या कायद्याला ग्रहण लागले आहे. हे ग्रहण सुटावे म्हणून आझाद मैदानात उपोषण सुरू केले आहे.




या पार्श्वभूमीवर उपोषणचे पत्र दिल्याने २९ मे रोजी अपूर्ण माहिती दिली. मात्र त्यातील महत्त्वाच्या एम बी चाचणी अहवाल मंजुर कामा पेक्षा जादा दिलेल्या बिलाची माहिती न दिल्याने भाई आकाश निर्मळ हे ४ तारखे पासून उपोषणास बसले असून त्यांना सहकार्य म्हणून लोकमित्र रमेश हिंदुराव, विद्य वाहुले, बाळु हरड हे बसले आहेत. म संगनमताने केलेला भ्रष्टाचार उघडकीस येऊ नये यासाठी हे माहीती देत नाहीत असे भाई आकाश निर्मळ यांनी यावेळी सांगितले.

केद्रीय माहितीचा अधिकार अंतर्गत वाडा भिवंडी मनोर हा रस्ता देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली सन २०२२-२०२३ केलेल्या कामाची माहिती २९ आक्टेंबर २०२५ रोजी शासकीय माहिती अधिकारी सा बा ठाणे क्र १ यांचेकडे मागितली होती. माहिती त्याच कार्यालयात उपलब्ध आसताना ती जव्हार कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयात मिळेल असे कळविले. त्यांच्याकडे पत्र व्यहवार केला आसता त्यांनी हि माहिती आमच्याकडे नसुन ती उप विभाग भिंवडी यांच्याकडे असेल असे कळविले. ते माहिती देत नसल्याने अखेर प्रथम अपील दाखल केले. त्याची सुनावणी २३ एप्रिल २६ रोजी होउन कार्यकारी अभियंता यांनी उपविभगीय अभियंता भिवडी यांना दिले. मात्र त्यांनी वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत आदेश पाळला नाही व माहिती दिली नाही.

## सरसकट कर्जमुक्तीसाठी क्रांतिकारी शेतकरी संघटनेचा एल्गार; जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांचा फडणवीस सरकारला निर्वाणीचा इशारा!

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी :** वाशिम, राज्य शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या कर्जमाफी संदर्भातील अटी व निकषांवर क्रांतिकारी शेतकरी संघटनेने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, कोणत्याही अटी-शर्थी न लावता राज्यातील सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती देण्याची मागणी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांनी केली आहे. शासनाच्या नव्या धोरणामुळे लाखो शेतकरी कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहण्याची शक्यता असल्याचा आरोप त्यांनी केला.



> "कर्जमाफी ही शेतकऱ्यांवरील कृपा नसून त्यांचा हक्क आहे. शासनाने कोणत्याही अटी-शर्थी न लावता सरसकट कर्जमुक्ती जाहीर करावी. अन्यथा ३० जूननंतर राज्यातील प्रत्येक गावात शेतकरी विद्रोह उभा राहील आणि त्याची संपूर्ण जबाबदारी शासनाची राहील."
>
> – बालाजी पाटील मोरे
> जिल्हाध्यक्ष, क्रांतिकारी शेतकरी संघटना, वाशिम

बालाजी पाटील मोरे म्हणाले की, राज्यातील शेतकरी सध्या अभूतपूर्व आर्थिक संकटाचा सामना करत आहे. सततच्या नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, गारपीट, नापिकी, वाढता उत्पादन खर्च, शेतीमालाला मिळणारे अपुरे बाजारभाव आणि वाढते कर्ज या सर्व समस्यांमुळे शेतकरी पूर्णपणे हतबल झाला आहे. अशा परिस्थितीत शासनाने दिलेली कर्जमाफी ही शेतकऱ्यांवर केलेली उपकाराची कृती नसून त्यांच्या जगण्याचा मूलभूत आधार आहे.

राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या निकषांमध्ये विविध अटी घालण्यात आल्या आहेत. या अटींमुळे अनेक पात्र शेतकरीही लाभापासून वंचित राहू शकतात. त्यामुळे शासनाने तात्काळ या अटी मागे घेऊन सर्व शेतकऱ्यांना सरसकट कर्जमुक्ती जाहीर करावी, अशी मागणी बालाजी पाटील मोरे यांनी केली आहे.

क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या वतीने शासनाला इशारा देताना मोरे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या भावना आणि वास्तव परिस्थितीकडे दुर्लक्ष करून घेतलेले निर्णय ग्रामीण भागात मोठा असंतोष निर्माण करत आहेत. शेतकरी आज आर्थिक, मानसिक आणि सामाजिक संकटात सापडला असून त्याच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम शासनाने करू नये.

बालाजी पाटील मोरे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, कर्जमाफीच्या नावाखाली पुन्हा एकदा शेतकऱ्यांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न झाला तर राज्यभर तीव्र जनआंदोलन छेडले जाईल. प्रत्येक गाव, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक जिल्ह्यात शेतकरी संघटनेच्या नेतृत्वाखाली आंदोलन उभे राहील. एकही शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहता कामा नये, ही आमची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, आजपर्यंत शेतकऱ्यांनी संयम राखला आहे. मात्र त्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहण्याचा प्रयत्न शासनाने करू नये. ३० जूनपर्यंत सकारात्मक निर्णय न झाल्यास राज्यभर शेतकरी रस्त्यावर उतरतील आणि त्यावेळी निर्माण होणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासनावर राहील.

शेतकऱ्यांच्या घामाची, कष्टाची आणि जीवन-मरणाच्या संघर्षाची थट्टा आम्ही सहन करणार नाही. शासनाने तात्काळ निर्णय घेऊन शेतकऱ्यांचा विश्वास कायम ठेवावा, अन्यथा राज्यात अभूतपूर्व शेतकरी आंदोलन उभे राहील, असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बालाजी पाटील मोरे यांनी दिला आहे.

## सिल्लोडमध्ये 'अमृत उद्यम' प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्था 'अमृत'तर्फे राबविण्यात येणाऱ्या 'अमृत उद्यम' प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ येथील शास्त्रीनगरमधील 'राज कॉम्प्युटर' येथे झाला. राज्य समन्वयक दीपक जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमाचा उद्देश युवक, युवती आणि महिलांना उद्योग क्षेत्रात सक्षम करणे हा आहे.




कार्यक्रमाचे उद्घाटन भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून विभाग व्यवस्थापक अमित सामंत, तर विभाग उपव्यवस्थापक ओंकार शेटे उपस्थित होते. व्यासपीठावर व्यवस्थापक अक्षय लंबे, जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे, सचिन उपळीकर, संदीप झालाणी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अमित सामंत यांनी उद्योजकतेसाठी आवश्यक असणारी मानसिकता, व्यवसायाची निवड, व्हिजन-मिशन स्टेटमेंटचे महत्त्व आणि नव्या युगातील व्यवसायाच्या संधी यावर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांच्या या संवादात्मक सादरीकरणाला उपस्थित लाभार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला. ओंकार शेटे यांनी व्यवसाय नियोजनातील सातत्य आणि विविध शासकीय योजनांचा प्रभावी वापर कसा करावा, यावर उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी सहभागी लाभार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले.

अमृततर्फे राबविण्यात येणाऱ्या या प्रशिक्षण कार्यक्रमात उद्योगाची निवड, आवश्यक शासकीय परवानग्या, बँक कर्ज, ब्रँडिंग, मार्केटिंग, सोशल मीडिया मार्केटिंग, विक्री व्यवस्थापन आणि निर्यात आदी विषयांचे तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. उद्योग सुरू होईपर्यंत आणि त्यानंतरही लाभार्थ्यांना मार्गदर्शन व पाठपुरावा करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जिल्हा उपव्यवस्थापक योगेश रोडे यांनी केले. प्रशिक्षणात परिसरातील युवक-युवतींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

## भाजपा विक्रोळी पार्कसाईट मंडळ यांच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**

**मुंबई,(केतन भोज) :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजपा विक्रोळी पार्कसाईट मंडळ यांच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते."झाडे लावा,झाडे जगवा आणि पर्यावरणाचे रक्षण करा" हा संदेश देत परिसरात वृक्षांची लागवड करण्यात आली. हा उपक्रम आमदार राम कदम तसेच भाजपा ईशान्य मुंबई जिल्हा उपाध्यक्ष अनिल भाई निर्मळे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला.पर्यावरण संवर्धन आणि हरित मुंबईच्या संकल्पनेला बळ देण्यासाठी वृक्षारोपणासोबतच झाडांचे संगोपन करण्याचाही संकल्प यावेळी करण्यात आला.या कार्यक्रमात भाजपा विक्रोळी पार्कसाईट मंडळ पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले.यावेळी पदाधिकाऱ्यांनी पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी वृक्षांचे महत्त्व अधोरेखित केले.वाढते प्रदूषण,तापमानवाढ आणि पर्यावरणीय समस्यांवर मात करण्यासाठी वृक्षारोपण ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.या वृक्षारोपण कार्यक्रमामुळे परिसरात पर्यावरणाबाबत जनजागृती होऊन नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले.

## आंबाडी परिसरातील आदिवासी शेतकऱ्याच्या शेतातील वृक्षाची अवैध्य तोड... संबंधितावर कार्यवाहीची मागणी

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी विश्वदीप कांबळे :** किनवटच्या आंबाडी परिसरात आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतातील झाडांची अवैध तोड झाल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून तोड झाडे ही अंबाडी वनपरिक्षेत्र हद्दित ठेवण्यात आले आहे .. याबाबत वनविभागाच्या अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल करण्यात आली असून, या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी वनपरिक्षेत्र अधिकारी किनवट यांच्याकडे लेखी स्वरूपात दिलीप मारोतराव पावडे यांनी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आंबाडी येथील आदिवासी शेतकरी सूर्यभान चित्रू कुमरे यांच्या गट क्रमांक 158/1 मधील शेतातील गैरी खैर, बेहडा, अंजन, येन आदी झाडांची तोड करण्यात आली आहे. मात्र, या झाडांची कोणतीही अधिकृत परवानगी किंवा फाईल दाखल करण्यात आलेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

तक्रारीनुसार काही वनकर्मचारी व संबंधितांनी संगनमताने झाडांची तोड करून लाकूड ट्रकमधून वाहतूक करण्याची तयारी केली होती. तसेच, विनापरवाना वृक्षतोड करून नंतर बनावट परवानग्या तयार करून लाकूड विक्री केली जात असल्याचा बनाव करण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे.



या अवैध वृक्षतोडिमुळे, आदिवासी शेतकऱ्यावर अन्याय होत असून त्याचे आर्थिक नुकसान केले जात असल्याचेही तक्रारीत नमूद आहे. त्यामुळे संबंधित वनरक्षक व वनपाल यांच्या कामकाजाची चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अन्यथा हे प्रकरण वन मंत्र्यांपर्यंत घेऊन जाण्याची तयारी तक्रारदाराने दर्शवली आहे.

या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून, आदिवासी शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## मजुराच्या मुलाची ध्येयपूर्ती: रहिमाबादच्या हर्षल साळवेची भारतीय सैन्यात निवड

**दैनिक युवक आधार**

**छत्रपती संभाजीनगर योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी :** अंगावर माती, हाताला कष्ट आणि डोळ्यांत देशसेवेचे स्वप्न... अशा संघर्षाच्या पार्श्वभूमीतून आलेल्या रहिमाबाद (ता. सिल्लोड) येथील हर्षल समाधान साळवे या तरुणाने आपल्या जिद्दीच्या जोरावर भारतीय सैन्य दलात स्थान मिळवले आहे. ३१ मे २०२६ रोजी त्याची भारतीय स्थल सैन्यात जनरल ड्यूटी (GD) पदावर निवड निश्चित झाली असून, या यशाबद्दल रहिमाबाद गावकऱ्यांनी हर्षलची भव्य मिरवणूक काढून आनंदोत्सव साजरा केला.



हर्षलच्या यशाचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. त्याने २ जुलै २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथील 'आय-ऑन-डिजिटल झोन'मध्ये ऑनलाईन परीक्षा दिली होती. त्यानंतर २५ फेब्रुवारी २०२६ रोजी छावणी, छत्रपती संभाजीनगर येथे पार पडलेल्या शारीरिक चाचणीत (ग्राउंड टेस्ट) त्याने आपली क्षमता सिद्ध केली. या सर्व चाचण्यांमध्ये यशस्वी ठरल्यानंतर ३१ मे २०२६ रोजी त्याची अंतिम निवड झाली. हर्षलचे पुढील प्रशिक्षण मध्य प्रदेशातील सागर येथे होणार आहे.हर्षलचे वडील समाधान साळवे हे अतिशय कष्टाची कामे करून आणि शेतमजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. "माझ्या मुलाने भारतीय सैनिक होऊन देशाच्या सीमेवर देशसेवा करण्याचे स्वप्न पाहिले होते, जे आज सत्यात उतरले आहे," अशी भावना वडील समाधान साळवे यांनी व्यक्त केली. हर्षलच्या या यशाचे संपूर्ण परिसरातून कौतुक होत असून, एका सामान्य कुटुंबातील मुलाने मिळवलेले हे यश युवा पिढीसाठी आदर्श ठरले आहे.

## निधन वार्ता

**दैनिक युवक आधार**

**निफाड :** येथील समीर प्रभाकर भंडारे (वय 44) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने निफाड परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात आई-वडील, दोन भाऊ व मुलगा आर्यन असा परिवार आहे. ते स्व. शांतीलालजी सोनी निफाड नागरी पतसंस्थेचे अधिकारी शाम भंडारे व सुधीर भंडारे यांचे बंधू होत. समीर भंडारे यांच्या निधनाने भंडारे कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून नातेवाईक, मित्रपरिवार व परिचितांकडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात येत आहे. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो, हीच प्रार्थना.

## ओबीसी जनगणना ही सामाजिक न्यायाची गरज – अक्षय वाघाये, सामाजिक कार्यकर्ता

**दैनिक युवक आधार**

**लाखनी :** ओबीसी, एससी आणि एसटी समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक स्थितीचे वास्तव चित्र देशासमोर यावे यासाठी जातनिहाय जनगणना अत्यंत आवश्यक असल्याचे मत सामाजिक कार्यकर्ते अक्षय वाघाये यांनी व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, "देशात विविध समाजघटकांच्या लोकसंख्येपासून ते शिक्षण, रोजगार, उद्योग, शेती, प्रशासन आणि आर्थिक स्थितीपर्यंतची अचूक माहिती उपलब्ध असणे हे लोकशाहीसाठी आवश्यक आहे. कोणत्या समाजघटकाला किती प्रतिनिधित्व मिळाले आहे आणि कोणते घटक अजूनही विकासाच्या प्रवाहापासून दूर आहेत, हे वस्तुनिष्ठ आकडेवारीतूनच स्पष्ट होऊ शकते."ते पुढे म्हणाले, "जातनिहाय जनगणना ही कोणत्याही समाजाविरोधात नसून सामाजिक न्याय आणि धोरणनिर्मितीसाठी आवश्यक साधन आहे. सरकारने सर्व समाजघटकांची सामाजिक-आर्थिक स्थिती पारदर्शकपणे जनतेसमोर आणावी. शिक्षण, नोकरी, उद्योग, जमीनधारणा, प्रशासनातील प्रतिनिधित्व आणि इतर महत्त्वाच्या क्षेत्रांतील माहिती उपलब्ध झाल्यास विकासाच्या संधींचे अधिक न्याय्य वाटप करण्यास मदत होईल."

खोब्रागडे यांनी असेही नमूद केले की, "सामाजिक न्यायाची अंमलबजावणी केवळ घोषणांनी होत नाही, तर त्यासाठी अचूक डेटा आणि वस्तुस्थितीची माहिती आवश्यक असते. त्यामुळे जनगणना आणि सामाजिक-आर्थिक सर्वेक्षण अधिक व्यापक आणि पारदर्शक पद्धतीने करण्यात यावे."त्यांच्या मते, देशातील सर्व समाजघटकांच्या प्रगतीचे वास्तव चित्र समोर आणण्यासाठी आणि धोरणे अधिक परिणामकारक बनविण्यासाठी सर्वसमावेशक आकडेवारी संकलनाला प्राधान्य देणे गरजेचे आहे.

# बी.ए. अर्थशास्त्र : Data Science, AI आणि रोजगाराच्या नव्या संधींकडे नेणारा भविष्याभिमुख अभ्यासक्रम

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** रोजगाराच्या नव्या संधींकडे नेणारा भविष्याभिमुख बी.ए. अर्थशास्त्र अभ्यासक्रम राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात सुरू करण्यात आला आहे. या नवीन अभ्यासक्रमाकरिता प्रवेश प्रक्रिया आरंभ झाली आहे.

**अर्थशास्त्राचा अभ्यास का करावा?**

आजच्या वेगाने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाच्या आणि जागतिकीकरणाच्या युगात विचारपूर्वक करिअर निवडणे फार आवश्यक आहे. १२ वी नंतर कोणकोणत्या संधी उपलब्ध आहेत जाणून घेणे फार आवश्यक आहे. विद्यार्थ्याने आपल्या आवडीनुसार करिअर निवडले तर तो आपल्या इच्छेनुसार कार्यक्षेत्र निवडू शकतो. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामध्ये सत्र २०२६-२७ पासून अर्थशास्त्रात रोजगाराभिमुख पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यात आला आहे. अर्थशास्त्र हा केवळ एक शैक्षणिक विषय नसून समाज, शासन, उद्योग, वित्तीय व्यवस्था आणि जागतिक अर्थव्यवस्था समजून घेण्याचा प्रभावी आणि महत्वपूर्ण दृष्टिकोन आहे. महागाई, बेरोजगारी, गरिबी, असमानता यासारख्या समस्यांबरोबरच आर्थिक विकास, जागतिक व्यापार, करप्रणाली, सार्वजनिक धोरणे, वित्तीय बाजारपेठा, डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), हवामान बदल आणि शाश्वत विकास यांसारख्या महत्त्वाच्या विषयांच्या केंद्रस्थानी अर्थशास्त्र आहे.

अर्थशास्त्राचा अभ्यास विद्यार्थ्यांना केवळ पदवी मिळवून देत नाही, तर जगाकडे वैज्ञानिक, तर्कशुद्ध आणि विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून पाहण्याची क्षमता विकसित करण्यास प्रवृत्त करतो. समाजातील आर्थिक समस्या समजून घेणे, त्यांचे विश्लेषण करणे आणि योग्य उपाय सुचविणे यासाठी अर्थशास्त्र महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. आज समाजामध्ये अभ्यासपूर्ण विषय मांडण्याची आणि योग्य दिशा देणाऱ्या विश्लेषकांची कमतरता आहे.

**अर्थशास्त्र विद्यार्थ्यांना काय शिकवते?**

अर्थशास्त्र केवळ पैशांचा किंवा बाजारपेठेचा अभ्यास नसून व्यक्ती, उद्योग, शासन आणि समाज यांच्या मदतीने उपलब्ध संसाधनांचा वापर करून आपल्या गरजा कशा पूर्ण करतात याचा शास्त्रीय अभ्यास आहे. अर्थशास्त्र विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक घडामोडींचे विश्लेषण करण्याची, त्यामागील कारणे समजून घेण्याची आणि समस्यांवर परिणामकारक उपाय शोधण्याची क्षमता विकसित करते. या विषयाच्या माध्यमातून विद्यार्थी स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि जागतिक स्तरावरील आर्थिक बदल समजून घेण्यास सक्षम होतात.

**अर्थशास्त्राच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांना अनेक प्रश्नांची उत्तरे मिळतात जसे -**

- अर्थव्यवस्था कशी कार्य करते?.
- देशाच्या आर्थिक विकासाला कोणते घटक चालना देतात?.
- शासनाद्वारे आर्थिक धोरणे कशी तयार करण्यात येतात आणि त्यांचा समाजावर कसा परिणाम होतो?.
- उद्योग, व्यापार, बँकिंग आणि वित्तीय संस्थांची अर्थव्यवस्थेतील भूमिका काय आहे?.
- बेरोजगारी, महागाई, गरिबी आणि विषमता यांसारख्या समस्या का व कशा निर्माण होतात?.
- आर्थिक विकास आणि सामाजिक कल्याण यांच्यातील संबंध काय आहे?.
- जागतिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर कसा परिणाम होतो?.
- उपलब्ध संसाधनांचा कार्यक्षम वापर कसा करता येतो?.
- माहिती, आकडेवारी आणि संशोधनाच्या आधारे योग्य निर्णय कसे घेतले जातात?.
- डिजिटल अर्थव्यवस्था, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि नवीन तंत्रज्ञान आर्थिक व्यवस्थेत कोणते बदल घडवून आणते?.
- शाश्वत विकासासाठी आर्थिक नियोजन कसे केले जाते?.
- आर्थिक प्रगती आणि सामाजिक न्याय यांच्यात संतुलन कसे साधले जाऊ शकते?.

**अर्थशास्त्राच्या अभ्यासामुळे विकसित होणारी कौशल्ये**

अर्थशास्त्राचा अभ्यास विद्यार्थ्यांना केवळ आर्थिक सिद्धांतांचे ज्ञान देत नाही, तर आधुनिक जगातील विविध आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक आणि वैयक्तिक क्षमता विकसित करतो. उपलब्ध माहितीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण करून योग्य निष्कर्ष काढणे, जटिल समस्यांचे तर्कशुद्ध आकलन करणे, पुराव्यांच्या आधारे निर्णय घेणे आणि बदलत्या आर्थिक परिस्थितीचे मूल्यांकन करणे या क्षमता विद्यार्थ्यांमध्ये विकसित होतात. आर्थिक, सामाजिक आणि विकासविषयक प्रश्नांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करण्याची दृष्टी निर्माण होते. तसेच संशोधन, माहितीचे सादरीकरण, अहवाल लेखन, नियोजन, संसाधन व्यवस्थापन आणि संघभावनेने कार्य करण्याची क्षमता विकसित होते. अर्थशास्त्राचा अभ्यास विद्यार्थ्यांना चिकित्सक, दूरदर्शी आणि जबाबदार विचारवंत बनवतो, ज्यामुळे ते उद्योग, शासन, वित्तीय संस्था, संशोधन संस्था आणि विविध व्यावसायिक क्षेत्रांमध्ये प्रभावीपणे कार्य करण्यास सक्षम होतात.

**डेटा सायन्स आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) युगात अर्थशास्त्राचे वाढते महत्त्व**

आजच्या डिजिटल युगात समंक शास्त्र (Data Science), Artificial Intelligence (AI), Machine Learning आणि Big Data यांचा वापर सर्वच क्षेत्रांमध्ये झपाट्याने वाढत आहे. उद्योग, वित्तीय संस्था, शासन, आरोग्य, शिक्षण आणि ई-कॉमर्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये दररोज प्रचंड प्रमाणात समंक निर्माण होत आहे. मात्र, केवळ समंक उपलब्ध असणे पुरेसे नाही; त्या समंकामागील आर्थिक, सामाजिक आणि मानवी वर्तनाशी संबंधित कारणे समजून घेणेही तितकेच महत्त्वाचे असते. याच ठिकाणी अर्थशास्त्राची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

समंक आपल्याला "काय घडत आहे?" हे सांगतो, तर अर्थशास्त्र "ते का घडत आहे?" आणि "त्याचे परिणाम काय असतील?" याचे स्पष्टीकरण देतो. त्यामुळे आर्थिक निर्णय, बाजारपेठेतील बदल, ग्राहकांचे वर्तन, गुंतवणूक, रोजगार, महागाई आणि विकास यांचे सखोल विश्लेषण करण्यासाठी अर्थशास्त्राची आवश्यकता अधिक वाढली आहे.

आज अनेक अग्रगण्य कंपन्या, बँका, संशोधन संस्था आणि शासन यंत्रणा अशा व्यक्तींचा शोध घेत आहेत ज्यांच्याकडे अर्थशास्त्राचे ज्ञान आणि समंक विश्लेषणाची कौशल्ये या दोन्हींचा संयोग आहे. त्यामुळे अर्थशास्त्र आणि समंक विश्लेषक यांचे संयोजन विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आकर्षक आणि भविष्याभिमुख करिअर संधी निर्माण करीत आहे. या दोन्ही क्षेत्रांच्या समन्वयामुळे आर्थिक प्रवाहांचा अंदाज बांधणे, बाजारपेठेतील बदल आणि ग्राहकांच्या पसंतीचे विश्लेषण करणे, वित्तीय जोखमींचे मूल्यांकन करणे आणि सार्वजनिक धोरणांच्या परिणामकारकतेचा अभ्यास करणे शक्य होते. तसेच उद्योग, व्यापार, गुंतवणूक आणि व्यवसाय व्यवस्थापन क्षेत्रात समंक-आधारित निर्णय प्रक्रियेला चालना मिळते. शाश्वत विकास, नैसर्गिक संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन आणि भविष्यातील आर्थिक नियोजनासाठीही अर्थशास्त्र व समंक शास्त्राचे एकत्रित ज्ञान अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे या दोन्ही क्षेत्रांचा संयोग विद्यार्थ्यांना आधुनिक रोजगार बाजारपेठेत अधिक सक्षम आणि स्पर्धात्मक बनवतो.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचा बी.ए. अर्थशास्त्र (AEDP / ऑनर्स / संशोधन) अभ्यासक्रम वैशिष्ट्यपूर्ण का आहे?.**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा अर्थशास्त्र विभाग शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून सुरू करीत असलेला बी.ए. अर्थशास्त्र (AEDP / ऑनर्स / संशोधन) हा अभ्यासक्रम विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी एक अद्वितीय आणि भविष्याभिमुख शिक्षणासह योजगाराची संधी आहे. हा केवळ पारंपरिक पदवी अभ्यासक्रम नसून, शिक्षण, कौशल्य विकास, उद्योग-अनुभव, संशोधन आणि रोजगारक्षमतेचा समन्वय साधणारा अभ्यासक्रम आहे.

विदर्भातील बहुसंख्य विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी पुणे, मुंबई, दिल्ली किंवा इतर महानगरांमध्ये जावे लागते. परंतु आता नागपूरमध्येच विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शिक्षण धोरण (NEP



2020) अनुषंगाने आधुनिक, संशोधनाभिमुख आणि उद्योग-संलग्न अर्थशास्त्र शिक्षण उपलब्ध होणार आहे. यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाची संधी स्थानिक स्तरावर उपलब्ध होईल.

या अभ्यासक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरच्या उद्दिष्टांनुसार तीन पर्याय उपलब्ध असतील—AEDP (Apprenticeship Embedded Degree Programme), Honours आणि Honours with Research. त्यामुळे या अभ्यासक्रमातून विद्यार्थी रोजगार, उच्च शिक्षण किंवा संशोधन यापैकी एकाची निवड करून प्रगती करू शकतील. हेच या अभ्यासक्रमाला इतर पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांपेक्षा वेगळे बनवते.

**१. बी.ए. अर्थशास्त्र (AEDP)**

अभ्यासक्रमाच्या अंतिम टप्प्यात विद्यार्थ्यांना सहा महिन्यांची अप्रेंटिसशिप म्हणजेच शिकाऊ उमेदवार प्रशिक्षण पूर्ण करावे लागते. या कालावधीत विद्यार्थ्यांना उद्योगातील कार्यपद्धती, व्यावसायिक वातावरण आणि प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण मिळते. अनेक संस्थांकडून विद्यार्थ्यांना १२३०० पर्यंत विद्यावेतन (स्टायपेंड) देखील दिले जाईल. AEDP (Apprenticeship Embedded Degree Programme) हा आधुनिक शिक्षण आणि उद्योग क्षेत्र यांच्यातील दुवा निर्माण करणारा रोजगाराभिमुख अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष उद्योग, वित्तीय संस्था, संशोधन संस्था, बँका, लॉजिस्टिक्स क्षेत्र, स्वयंसेवी संस्था आणि विविध शासकीय विभागांमध्ये काम करण्याचा अनुभव मिळतो. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योगाला आवश्यक असलेली कौशल्ये विकसित होतात आणि त्यांना वास्तविक कामकाजाची ओळख पदवी पूर्ण होण्यापूर्वीच प्राप्त होते. शिकाऊ उमेदवार प्रशिक्षणाच्या (अप्रेंटिसशिप) माध्यमातून विद्यार्थ्यांचा उद्योग व संस्थांशी संपर्क वाढतो, व्यावसायिक नेटवर्क तयार होते आणि रोजगाराच्या संधी अधिक सुलभ होतात. शासनाच्या मदतीने या उद्योग संस्थांकडून अप्रेंटिसशिप कालावधीत १२३०० पर्यंत विद्यावेतन (स्टायपेंड) दिले जात असल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक लाभही मिळू शकतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे, पदवी पूर्ण होताच विद्यार्थ्यांकडे शैक्षणिक पात्रतेबरोबरच उद्योगातील प्रत्यक्ष अनुभव असल्यामुळे त्यांची रोजगारक्षमता लक्षणीयरीत्या वाढते. त्यामुळे AEDP हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना "शिकत असतानाच उद्योगाचा अनुभव" आणि "करिअरची लवकर सुरुवात" या दोन्ही संधी उपलब्ध करून देणारा एक प्रभावी आणि भविष्याभिमुख पर्याय ठरतो. ज्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासोबत लगेच रोजगाराच्या संधी शोधायच्या आहेत, त्यांच्यासाठी AEDP हा सर्वोत्तम पर्याय आहे.

**२. बी.ए. अर्थशास्त्र (ऑनर्स)**

बी.ए. अर्थशास्त्र (ऑनर्स) हा चार वर्षांचा प्रगत पदवी अभ्यासक्रम असून विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विषयातील सखोल आणि विशेषीकृत ज्ञान प्रदान करतो. नियमित पदवी अभ्यासक्रमाच्या तुलनेत ऑनर्स अभ्यासक्रमामध्ये विषयाचा अधिक व्यापक आणि सखोल अभ्यास केला जातो. विद्यार्थ्यांना सूक्ष्म अर्थशास्त्र, स्थूल अर्थशास्त्र, विकास अर्थशास्त्र, सार्वजनिक अर्थशास्त्र, आंतरराष्ट्रीय अर्थशास्त्र, अर्थमिती, वित्तीय प्रणाली आणि समकालीन आर्थिक प्रश्न यांसारख्या विषयांचे प्रगत ज्ञान प्राप्त होते.

हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांमध्ये आर्थिक घडामोडींचे विश्लेषण करण्याची क्षमता, तार्किक विचारशक्ती, समंक समजून घेण्याची कौशल्ये आणि आर्थिक समस्यांवर उपाय शोधण्याची क्षमता विकसित करतो. आधुनिक अर्थव्यवस्थेत निर्णय घेण्यासाठी आवश्यक असलेली सांख्यिकीय आणि परिमाणात्मक कौशल्ये विद्यार्थ्यांना प्राप्त होतात. याशिवाय, समंक विश्लेषक, वित्तीय बाजारपेठा, सार्वजनिक धोरणे आणि जागतिक अर्थव्यवस्था यांचा अभ्यास विद्यार्थ्यांना बदलत्या आर्थिक वातावरणाशी जुळवून घेण्यास सक्षम बनवतो.ऑनर्स पदवी पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाच्या अनेक संधी उपलब्ध होतात. ते एम.ए. अर्थशास्त्र, उपयोजित अर्थशास्त्र, अर्थमिती, सार्वजनिक धोरण, समंक विश्लेष, एमबीए किंवा इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांकडे वाटचाल करू शकतात. तसेच UPSC, MPSC, RBI, NABARD, बँकिंग सेवा, आर्थिक व सांख्यिकी सेवा यांसारख्या स्पर्धा परीक्षांसाठीही आणि रोजगाराच्या दृष्टीने बँकिंग, वित्तीय सेवा, बाजार संशोधन, व्यवसाय विश्लेषण, आर्थिक सल्लागार सेवा,समंक विश्लेषक आणि कॉर्पोरेट क्षेत्राकरिता हा अभ्यासक्रम अत्यंत उपयुक्त ठरतो.

**३. बी.ए. अर्थशास्त्र (ऑनर्स विथ रिसर्च)**

बी.ए. अर्थशास्त्र (ऑनर्स विथ रिसर्च) हा अभ्यासक्रम अशा विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आला आहे ज्यांना संशोधन, अध्यापन, धोरण विश्लेषण, विकास अध्ययन किंवा उच्च शिक्षण क्षेत्रात करिअर घडवायचे आहे. या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना अर्थशास्त्राचे सखोल ज्ञान मिळण्याबरोबरच संशोधनाची प्रत्यक्ष प्रशिक्षण प्रक्रिया अनुभवण्याची संधी मिळते.

चौथ्या वर्षात विद्यार्थ्यांना संशोधनपद्धती (Research Methodology), प्रगत अर्थमिती (Advanced Econometrics), समंक विश्लेषण, धोरण विश्लेषण आणि संशोधन लेखन यांचे विशेष प्रशिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांना स्वतंत्र संशोधन प्रकल्प हाती घेऊन संशोधन प्रबंध (Dissertation) तयार करावा लागतो. या प्रक्रियेत विद्यार्थ्यांना समंक संकलन, क्षेत्रीय सर्वेक्षण, सांख्यिकीय विश्लेषण, निष्कर्ष मांडणी आणि अहवाल लेखन यांचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो.

या अभ्यासक्रमाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थी स्वतःच्या संशोधनाद्वारे समाज, अर्थव्यवस्था आणि सार्वजनिक धोरणांशी संबंधित प्रश्नांचा अभ्यास करू शकतात. कृषी, रोजगार, ग्रामीण विकास, महिला सक्षमीकरण, वित्तीय समावेशन, डिजिटल अर्थव्यवस्था, हवामान बदल, शाश्वत विकास, लॉजिस्टिक्स, सार्वजनिक वितरण व्यवस्था आणि विदर्भाच्या आर्थिक विकासासारख्या विषयांवर संशोधन करण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळते. ऑनर्स विथ रिसर्च पूर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यांना संशोधन संस्था, थिंक टँक, सार्वजनिक धोरण संस्था, विकास संस्था, आंतरराष्ट्रीय संघटना आणि विद्यापीठीय संशोधन प्रकल्पांमध्ये काम करण्याच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध होतात. तसेच UGC च्या विद्यमान मार्गदर्शक तत्त्वांनुसार हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना पीएच. डी.च्या दिशेने पुढे जाण्यासाठी मजबूत पाया उपलब्ध करून देतो.

आजच्या ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत संशोधन, समंक विश्लेषण आणि पुराव्यावर आधारित धोरणनिर्मिती यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे ऑनर्स विथ रिसर्च हा पर्याय विद्यार्थ्यांना केवळ रोजगारासाठी नव्हे तर ज्ञाननिर्मिती, संशोधन नेतृत्व आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक संधींसाठीही सक्षम बनवतो. हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना भविष्यातील संशोधक, धोरण विश्लेषक, प्राध्यापक, आर्थिक सल्लागार आणि विकास तज्ज्ञ म्हणून घडविण्याची क्षमता ठेवतो.

विदर्भातील विद्यार्थ्यांसाठी या कार्यक्रमाची आवश्यकता

विदर्भ हा कृषीप्रधान प्रदेश असून येथे कृषी, ग्रामीण विकास, औद्योगिक वाढ, रोजगारनिर्मिती, लॉजिस्टिक्स, खनिज संसाधने, ऊर्जा क्षेत्र आणि मानवी विकास यांसारख्या अनेक आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करण्याची गरज आहे. या प्रदेशाच्या विकासासाठी स्थानिक समस्यांची जाण असलेले आणि त्यावर संशोधन व धोरणात्मक उपाय सुचवू शकणारे प्रशिक्षित अर्थशास्त्रज्ञ आवश्यक आहेत.

हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना केवळ राष्ट्रीयच नव्हे तर विदर्भाच्या विकासाशी संबंधित प्रश्नांचा अभ्यास करण्याची संधी देईल. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्थानिक विकासासाठी योगदान देण्याची क्षमता विकसित होईल. प्रादेशिक विकासासाठी आर्थिक विश्लेषण आणि धोरणनिर्मिती महत्त्वाची मानली जाते.

**विदर्भाला होणारे फायदे**

या कार्यक्रमामुळे विदर्भातील आर्थिक, सामाजिक आणि विकासविषयक प्रश्नांवर स्थानिक स्तरावर संशोधन वाढेल. कृषी, ग्रामीण विकास, उद्योग, रोजगार, महिला सक्षमीकरण, वित्तीय समावेशन, लॉजिस्टिक्स, ऊर्जा आणि मानवी विकास यांसारख्या विषयांवर अभ्यास आणि धोरणात्मक सूचना उपलब्ध होतील.

स्थानिक उद्योग, बँका, स्वयंसेवी संस्था आणि शासन विभागांना प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध होईल. संशोधन आणि कौशल्याधारित शिक्षणामुळे प्रदेशाच्या विकासासाठी आवश्यक असलेले मानवी भांडवल (Human Capital) निर्माण होईल. प्रादेशिक विकासामध्ये शिक्षण, कौशल्ये आणि संशोधन यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची मानली जाते.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचा बी.ए. अर्थशास्त्र (AEDP / ऑनर्स / ऑनर्स विथ रिसर्च) हा अभ्यासक्रम केवळ पदवी प्रदान करणारा कार्यक्रम नसून विद्यार्थ्यांना ज्ञान, कौशल्य, उद्योग-अनुभव, संशोधन क्षमता आणि रोजगारक्षमतेने परिपूर्ण करणारा एक सर्वसमावेशक शैक्षणिक उपक्रम आहे. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने विकसित करण्यात आलेला हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना रोजगार, उच्च शिक्षण, संशोधन आणि स्पर्धा परीक्षा या सर्व क्षेत्रांमध्ये सक्षम बनविणारा आहे. विशेषतः विदर्भातील विद्यार्थ्यांना स्थानिक स्तरावर गुणवत्तापूर्ण, उद्योगाभिमुख आणि संशोधनाधारित शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार आहे. आधुनिक अर्थव्यवस्था, डेटा विश्लेषण, सार्वजनिक धोरणे आणि विकास क्षेत्रातील वाढत्या संधी लक्षात घेता, बी.ए. अर्थशास्त्र हा विद्यार्थ्यांसाठी उज्ज्वल भविष्याचा भक्कम पाया ठरेल. अधिक माहितीकरिता अर्थशास्त्र विभाग, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर किंवा विद्यापीठाच्या www.nagpuruniversity.ac.in या संकेत स्थळावर संपर्क साधता येईल.

**डॉ. समित माहोरे**
**सहयोगी प्राध्यापक,**
**अर्थशास्त्र विभाग,**
**संचालक, आजीवन अध्ययन व विस्तार विभाग,**
**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर**

# मरोळ अशोक नगर भागातील मिठीनदी सफाईकडे पालिकेने फिरवली पाठ

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** दरवर्षी महापालिकेकडून पावसाळ्यापूर्वी मुंबईतील गटारे,नाले आणि मुख्यत्वे मिठी नदी सफाई बाबत मोठा गाजावाजा केला जातो.याकरिता दरवर्षी करोडो रुपयांचे टेंडर काढले जातात. मात्र ठेकेदारांकडून या सफाईबाबत योग्य ती दखल घेतली जात नसल्याचे चित्र आहे. जुजबी काम करून नालेसफाई झाल्याचे भासवले जाते.आणि त्याचा परिणाम अनेक सखल भागात पाणी साचल्याने रहिवाशांना पडझड,नुकसानीसह मोठा त्रास सहन करावा लागतो.आंतरराष्ट्रीय विमानतळ ते बामनदया पाडा या दोन अडीच किलोमीटर दरम्यान महापालिकेकडून मोठ्या आवेशात नाले सफाईचे काम हाती घेण्यात आले होते.विमानतळ व बामनदया पाडा येथील बऱ्याच भागातील नदीपात्र साफ करण्यात आले.मात्र अशोक नगर भागातील मिठी नदीकडे महापालिकेने पाठ फिरवली असून अद्यापही या नदी पात्राची कोणत्याही प्रकारे साफसफाई झाल्याचे दिसून येत नाही. नदीपात्रात चिखल,माती,कचरा,दगड गोटे किंवा झाडे झुडपे मोठ्या प्रमाणात दिसून येतात.महापालिकेच्या आदेशानुसार याची साफसफाई ३१ मे पूर्वी होने आवश्यक होते मात्र.या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचे या निमित्ताने दिसून येते. महापालिकेकडून यावर्षी पावसाळ्यापूर्वी सर्व नाले,गटारे यांची पूर्णपणेसफाई करण्यात येते. यावर्षी मात्र महापालिकेने ३१ मे पूर्वी नालेसफाई पूर्ण करण्याचे आदेश दिले होते.मुंबईच्या महापौर रितू तावडे यांनी अधिकाऱ्यांसह अनेक ठिकाणी दौरे करून कामाची पाहणी केली होती.३१ मे पर्यंत हे सर्व नाले,गटारे व मिठीनदी पात्र पूर्णपणे साफ होईल असेही यावेळी सांगण्यात आले होते.मात्र ह्या गोष्टी हवेतच विरून गेल्याचे स्पष्ट झाले आहे.आंतरराष्ट्रीय विमानतळ व बामनदया पाडा या दोन्ही बाजूची बऱ्याच प्रमाणात नालेसफाई करण्यात आली. मात्र या दरम्यान असलेल्या अशोक नगर भागातील मिठी नदीचे पात्र अजूनही साफ झाल्याचे दिसून येत नाही. याबाबत स्थानिक नागरिकांमधून संताप व्यक्त केला जात असून या विभागात पाणी घुसण्याची भीती व्यक्त केली आहे.महापालिकेच्या कामकाजाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# तळोजा गाव येथे राज्य रस्ते विकास महामंडळाने मोठी पाडकाम कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर ) :** पुणे-मुंबई राष्ट्रीय महामार्ग क्रमांक - ४ वरील पनवेल-मुंब्रा मार्गावरील तळोजा गाव येथे राज्य रस्ते विकास महामंडळाने मोठी पाडकाम कारवाई केली आहे. रस्त्याकडेला असलेली ग्रामस्थांची जवळपास ६० दुकाने आणि १० घरे बुलडोझरने जमीनदोस्त केली. पिढ्यानपिढ्या सुरू असलेले वडिलोपार्जित व्यवसाय अचानक नष्ट झाल्यामुळे १०० हून अधिक कुटुंबांचा रोजगार हिरावला गेला असून, स्थानिक रहिवाशांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण पसरले आहे.तळोजा गावालगत ग्रामस्थांनी अनेक वर्षांपासून आपली दुकाने थाटली होती. दोन वर्षांपूर्वी महामंडळाने ही जागा पुणे-मुंबई कॉरिडॉरमध्ये येत असल्याचे सांगत कागदपत्रे सादर करण्याची नोटीस दिली होती. त्यानंतर ग्रामस्थांच्या पत्रव्यवहारामुळे ही कारवाई थांबली होती. परंतु मे महिन्यात विकास महामंडळाने दुकान व्यावसायिकांना अतिक्रमण हटवण्यास सांगितले. या वेळी गावातील शरद पवार गटाचे पदाधिकारी फारूक पटेल यांनी खासदार सुप्रिया सुळे यांची भेट घेऊन समस्या निदर्शनास आणून दिली. सुळे यांनी संबंधित विभागाचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि प्रभावित नागरिक यांची संयुक्त बैठक आयोजित करून यावर योग्य मार्ग काढण्याची सूचना केली होती. मात्र याकडे अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष करून कारवाई केली.

# मॉसिकॉलची २५ एकर जागा सार्वजनिक हितासाठी राखीव ठेवण्याच्या हालचाली; शासनाकडे हस्तांतरणाचे महसूलमंत्र्यांचे आदेश

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका :** अमरावती शहराच्या मध्यवर्ती भागातील महाराष्ट्र राज्य तेलबियाणे वाणिज्य आणि औद्योगिक महामंडळ (मॉसिकॉल) कारखान्याची सुमारे २५ एकर मौल्यवान जागा खाजगी विक्रीस काढण्याऐवजी सार्वजनिक हितासाठी राखीव ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण हालचाली सुरू झाल्या आहेत. अमरावतीच्या आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांनी सुचविलेल्या विविध सार्वजनिक आरक्षणाच्या पर्यायांवर महसूल मंत्रालयात झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मॉसिकॉलची जमीन शासनाकडे हस्तांतरित करण्याचे आदेश दिले.

आमदार सुलभाताई खोडके यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी महसूलमंत्री बावनकुळे यांना पत्र देऊन मॉसिकॉलची जमीन सार्वजनिक वापरासाठी राखून ठेवण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने ३ जून रोजी मंत्रालयात आयोजित बैठकीत या विषयावर सखोल चर्चा झाली. बैठकीस विधान परिषद सदस्य संजय खोडके तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

अमरावती विधानसभा मतदारसंघातील मॉसिकॉलची ही जमीन शहराच्या मध्यवर्ती आणि मोक्याच्या ठिकाणी असल्याने भविष्यातील विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची मानली जाते. शहराचा झपाट्याने विस्तार होत असताना सार्वजनिक वापरासाठी किंवा शासकीय कार्यालये उभारण्यासाठी मोठ्या भूखंडांची कमतरता भासत आहे. अशा परिस्थितीत ही जागा जिल्हास्तरीय प्रशासकीय इमारती, न्यायालयीन संकुल, शासकीय कार्यालये तसेच विविध सार्वजनिक सुविधांसाठी उपयोगी पडू शकते.

बैठकीत या जागेचा सार्वजनिक हितासाठी प्रभावी वापर करण्याच्या विविध पर्यायांचा आढावा घेण्यात आला. तसेच ही जमीन





खाजगी विक्रीस न काढता सार्वजनिक आरक्षणासाठी राखून ठेवण्याबाबतचा प्रस्ताव मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले. महसूलमंत्री बावनकुळे यांनी सदर जमीन जिल्हाधिकारी कार्यालयाकडे हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश दिले असून सार्वजनिक आरक्षणासंदर्भातील प्रस्ताव कॅबिनेटकडे पाठविण्याच्या सूचनाही दिल्या आहेत.

याबाबत आमदार सुलभाताई खोडके यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. अमरावती शहराच्या दीर्घकालीन विकासासाठी आणि नागरिकांच्या हितासाठी ही जागा भविष्यातील गरजांसाठी राखून ठेवणे आवश्यक असल्याची भूमिका त्यांनी मांडली. शहराच्या मध्यभागी एवढा मोठा भूखंड उपलब्ध असणे ही दुर्मिळ बाब असल्याने त्याचा वापर जनहितासाठीच व्हावा, अशी त्यांची मागणी आहे.

**निविदा प्रक्रिया आधीच रद्द**

दरम्यान, मॉसिकॉलची ही जागा विक्रीसाठी काढण्यात आलेली निविदा प्रक्रिया यापूर्वीच रद्द करण्यात आली आहे. कॉटन फेडरेशनकडे १९९३ मध्ये हस्तांतरित झालेल्या या जागेच्या विक्रीसाठी दोन वेळा निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. मात्र अमरावती शहराच्या वाढत्या गरजा लक्षात घेता ही जागा विक्रीस विरोध झाला.

विधान परिषद सदस्य संजय खोडके यांनी १३ मार्च २०२६ रोजी राज्याच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडून मॉसिकॉलची जागा विक्रीस काढण्यास तीव्र विरोध दर्शविला होता. शहरातील नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन ही जागा शासकीय कारणांसाठी राखून ठेवावी, अशी मागणी त्यांनी केली होती. त्यावर उत्तर देताना मंत्री जयकुमार रावल यांनी जानेवारी २०२६ मध्ये राबविण्यात आलेली निविदा प्रक्रिया शासनाच्या वतीने रद्द करण्यात आल्याची घोषणा केली होती.

आता महसूल मंत्रालयातील बैठकीनंतर मॉसिकॉलची जमीन शासनाकडे हस्तांतरित करून सार्वजनिक हितासाठी राखीव ठेवण्याच्या प्रक्रियेला गती मिळणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

त्यामुळे अमरावतीच्या भविष्यातील नियोजनबद्ध विकासाला नवी दिशा मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## खतांचा काळाबाजार रोखण्यासाठी आणि वेळेवर पुरवठ्यासाठी 'मोबाईल ॲप' आणा; शेतकऱ्यांची सरकारकडे मागणी !!

**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे अकोला प्रतिनिधी :** शेतकर्यांना दरवर्षीच ऐन हंगामाच्या तोंडावर रासायनिक खतांचा तुटवडा, यामुळे शेतकऱ्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागते. या सर्व समस्यांवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी आणि शेतकऱ्यांना वेळेवर खते उपलब्ध करून देण्यासाठी सरकारने एक हक्काचे मोबाईल ॲप्लिकेशन विकसित करून ते लवकरच वापरत आणावे अशी आग्रही मागणी आता शेतकरी वर्गातून केली जात आहे.

हे अँप आणल्यास शेतकर्यांना ॲपच्या माध्यमातून घरबसल्या खतांची बुकिंग करण्याची सुविधा मिळाल्यास शेतकऱ्यांना खतांसाठी दुकानांसमोर तासनतास रांगेत उभे राहावे लागणार नाही. सध्या खत खरेदीसाठी शेतकऱ्यांना कृषी सेवा केंद्रांवर प्रत्यक्ष जावे लागते. अनेकदा खते उपलब्ध असूनही काही कृषी केंद्राकडून कृत्रिम टंचाई निर्माण केली जाते किंवा खतांसोबत इतर अनावश्यक मायक्रोन्युट्रिएंट्स (लिंकिंग) घेण्याची सक्ती केली जाते. जर सरकारने अधिकृत मोबाईल ॲप आणले, तर पारदर्शकता येईल कोणत्या दुकानात, कोणत्या कंपनीचे, किती खत उपलब्ध आहे याची अचूक माहिती थेट मोबाईलवर दिसेल. आज सर्व गोष्टी ऑनलाईन होत आहे त्याच प्रमाणे शेतकऱ्यांना खतासाठी पण ऑनलाईन नोंदणी आवश्यक करावी. यामुळे खत विक्री त पारदर्शकता वाढेल. अशी मागणी आता सामान्य शेतकरी करताना दिसत आहेत.

खतांचे दर आणि साठा ऑनलाईन उपलब्ध असल्यामुळे व्यापाऱ्यांना चढ्या दराने खत विकता येणार नाही.

या मोबाईल अँप मुळे शेतकऱ्यांनी आपल्या सातबारा आणि आधार कार्डच्या आधारे नोंदणी केल्यास, त्यांच्या जमिनीच्या गरजेनुसार किती खत हवे आहे, याचे बुकिंग करता येऊ शकते. यामुळे डिजिटल पेमेंट करून किंवा दुकानात जाऊन पैसे देऊन थेट खत उचलणे शक्य होईल.

आज डिजिटल इंडियाच्या काळात देशातील लहानांत लहान शेतकरीही स्मार्टफोन वापरत आहे. पीएम किसान सन्मान निधी असो की पीक विमा, सर्व गोष्टी ऑनलाईन होत आहेत. याच धर्तीवर जर खत वितरण प्रणाली सुद्धा ॲपच्या माध्यमातून ऑनलाईन केली, तर खतांचा काळाबाजार पूर्णपणे मोडीत निघेल.

आता यावर सरकार सकारात्मक पाऊल उचलून आगामी हंगामापूर्वी असे एखादे डिजिटल व्यासपीठ शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देणार का, याकडे संपूर्ण शेतकरी वर्गाचे लक्ष लागले आहे.

पाऊस कधी पडेल याचा नेम नसतो, त्यात पाऊस पडल्यावर खत मिळवण्यासाठी शेतकऱ्यांना शेतीची कामे सोडून दिवसभर कृषी सेवा केंद्रांसमोर रांगेत उभे राहावे लागते. जर मोबाईलवरूनच खतांचे बुकिंग झाले, तर थेट दुकानात जाऊन आपला कोटा आणणे सोपे होईल.

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त धाकटा खांदा येथे वृक्षारोपण व मोफत रोपवाटप कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पनवेल(प्रतिनिधी) :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक १४ च्या वतीने धाकटा खांदा येथे वृक्षारोपण व मोफत रोपवाटप कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि जनसहभागातून संपन्न झाला. पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे उद्घाटन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते वृक्षारोपण करून करण्यात आले.

केंद्र सरकारच्या "एक झाड आईच्या नावाने" या संकल्पनेला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांची रोपे नागरिकांना मोफत वितरित करण्यात आली. तसेच परिसरात वृक्षारोपण करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. वाढते प्रदूषण, हवामान बदल आणि पर्यावरणीय असंतुलन यांसारख्या गंभीर समस्यांच्या पार्श्वभूमीवर वृक्षसंवर्धनाची गरज अधोरेखित करण्यात आली. यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी प्रत्येक नागरिकाने पर्यावरण संरक्षणासाठी




पुढाकार घेणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. केवळ झाडे लावणे नव्हे तर त्यांचे संगोपन आणि संवर्धन करणेही तितकेच महत्त्वाचे असल्याचे त्यांनी नमूद केले. पर्यावरणपूरक जीवनशैली स्वीकारून भावी पिढ्यांसाठी सुरक्षित आणि हरित भविष्य घडविण्यासाठी सर्वांनी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

या कार्यक्रमाला माजी नगरसेवक गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका सारिका भगत, माजी नगरसेविका हेमलता म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, भारतीय जनता पार्टी ओबीसी सेलचे अध्यक्ष सतीश पाटील, प्रभाग अध्यक्ष गणेश म्हात्रे, युवा मोर्चा प्रभाग अध्यक्ष कृणाल पाटील यांच्यासह स्थानिक नागरिक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली. धाकटा खांदा गावातील नागरिकांनी आणि कार्यकर्त्यांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य आणि नव्या उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा संकल्प केला. "आज लावलेले एक झाड उद्याच्या पिढीला शुद्ध हवा, सावली, आरोग्यदायी वातावरण आणि सुरक्षित भविष्य देऊ शकते," असा संदेश देत प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन करण्यात आले. हा उपक्रम पर्यावरण जनजागृती, सामाजिक बांधिलकी आणि लोकसहभाग यांचे उत्कृष्ट उदाहरण ठरला असून भविष्यातही अशा लोकहितकारी उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## योगीजींच्या वाढदिवशी हिंदू युवा वाहिनी महाराष्ट्र प्रभारीपदी स्वप्निल गोवर्धने यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे प्रतिनिधी :** उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या वाढदिवसानिमित्त हिंदू युवा वाहिनीच्या महाराष्ट्र राज्य प्रभारीपदी स्वप्निल गोवर्धने यांची नियुक्ती करण्यात आली आहे.हिंदू युवा वाहिनीचे राष्ट्रीय अध्यक्ष विक्रम सिंह राठोड आणि भारतीय जनता पक्षाच्या केंद्रीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही घोषणा करण्यात आली. बॅनरवर भाजपचा ध्वज आणि हिंदू युवा वाहिनीचा लोगो झळकत आहे. नव्या जबाबदारीबद्दल बोलताना स्वप्निल गोवर्धने यांनी सांगितले की, ही जबाबदारी केवळ पद नसून अनेक वर्षांच्या कार्याची पावती आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना, धोरणे तसेच प्रशासकीय व्यवस्थेची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्याचे काम आपण आतापर्यंत केले आहे, असे ते म्हणाले.पुढील काळात महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावपातळीवर हिंदू युवा वाहिनीचे संघटन मजबूत करणे, युवकांना संघटित करणे आणि शासनाच्या विविध योजनांची माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे हे आपले प्राधान्य असेल, असे गोवर्धने यांनी स्पष्ट केले. यासाठी सर्व




कार्यकर्त्यांच्या सहकार्याने व्यापक जनसंपर्क मोहीम राबविली जाईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. नियुक्तीमुळे महाराष्ट्रात संघटनात्मक कामाला गती मिळेल आणि जनतेपर्यंत प्रशासकीय माहिती अधिक प्रभावीपणे पोहोचेल, अशी अपेक्षा संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

## ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालकांच्या १००% पदभरतीसाठी मुंबईत 'बेमुदत धरणे'; ८ जूनपासून महासंघाचा एल्गार!

**दैनिक युवक आधार**

**क्रीडा प्रतिनिधी निफाड विलास गायकवाड :** राज्यातील अनुदानित वरिष्ठ महाविद्यालयांमधील २०१७ नंतरच्या प्राध्यापक संवर्गातील ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालक यांची १०० टक्के पदभरती तातडीने करण्यात यावी आणि त्यासंबंधीचा शासन निर्णय (GR) तात्काळ निर्गमित करावा, या मुख्य मागणीसाठी 'महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक महासंघ' पूर्णपणे आक्रमक झाला आहे. आपल्या न्याय्य हक्कांसाठी येत्या सोमवार, दिनांक ८ जून २०२६ पासून मुंबईतील आझाद मैदान येथे बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा निर्धार महासंघाने जाहीर केला आहे.

**आंदोलनाची पार्श्वभूमी आणि तीव्र असंतोष**

महाविद्यालयीन स्तरावर प्राचार्य पदाच्या खालोखाल शारीरिक शिक्षण संचालक आणि ग्रंथपाल ही पदे अत्यंत महत्त्वाची आणि कळीची मानली जातात. मात्र, दुर्दैवाने २०१७ पासून म्हणजेच गेली नऊ वर्षे वरिष्ठ महाविद्यालयांतील ही पदे रिक्तच आहेत. धक्कादायक बाब म्हणजे, आजच्या घडीला अनेक महाविद्यालयांमध्ये क्रीडा व ग्रंथालय विभाग सांभाळणारे असंख्य उच्चशिक्षित व पात्रताधारक तरुण कोणतीही वेतन न घेता (विनावेतन) काम करत आहेत. मागील काही वर्षांत या पदांसाठी तासिका तत्त्वाचे (CHB) धोरणही लागू करण्यात आले नव्हते, ज्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपालांमध्ये आधीच तीव्र असंतोष निर्माण झाला होता.

**शासन निर्णयामुळे (GR) पदरी निराशा**

**११ फेब्रुवारी २०२६ चा तो निर्णय आणि अन्याय...**

राज्य शासनाने ११ फेब्रुवारी २०२६ रोजी ५,०१२ सहाय्यक प्राध्यापकांच्या पदभरतीचा शासन निर्णय निर्गमित केला होता. या निर्णयामुळे वर्षानुवर्षे वाट पाहणाऱ्या ग्रंथपाल आणि शारीरिक शिक्षण संचालकांच्या आशा पल्लवित झाल्या होत्या. मात्र, या शासन निर्णयामध्ये या दोन्ही महत्त्वाच्या पदांचा समावेशच करण्यात आला नाही. शासनाच्या या दुजाभावामुळे पात्रताधारकांच्या पदरी पुन्हा एकदा घोर निराशा पडली असून, त्यांच्यातील संतापाचा उद्रेक आता आंदोलनाच्या रूपाने बाहेर पडत आहे.

**'राष्ट्रीय शैक्षणिक धोरणा'च्या (NEP) दाव्यांना हरताळ?**

महाविद्यालयांमध्ये ही पदे दीर्घकाळ रिक्त राहिल्याने क्रीडा विभाग आणि ग्रंथालयांच्या दैनंदिन कामकाजात प्रचंड अडथळे येत आहेत. एकीकडे राज्य शासन 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०' (NEP 2020) लागू करून युवा पिढीला गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यास कटिबद्ध असल्याचे सातत्याने सांगत आहे; मात्र दुसरीकडे शारीरिक शिक्षण आणि ग्रंथालयासारख्या पायाभूत घटकांकडेच दुर्लक्ष केले जात आहे. शासनाचा हा दुटप्पीपणा थांबवून या गंभीर समस्येची तातडीने दखल घ्यावी आणि पदभरतीचा जीआर काढावा, अशी आग्रही मागणी महासंघाने केली आहे.

**आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन**

या बेमुदत धरणे आंदोलनाद्वारे शासनाचे डोळे उघडण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रातील शारीरिक शिक्षण संचालक व ग्रंथपालांनी मुंबईतील आझाद मैदानावर मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे जाहीर आवाहन महासंघाचे पदाधिकारी श्री. संदीप मनोरे (संस्थापक, महाराष्ट्र राज्य वरिष्ठ महाविद्यालयीन शारीरिक शिक्षण संचालक महासंघ व डॉ. गणेश सिंहासने (अध्यक्ष)प्रा. तायाप्पा शेंडगे (राज्य सचिव)प्रा. वैशाली सरगर (धडस) (जिल्हा उपाध्यक्ष) यांनी केलेले आहे.

## गव्हाणमधील जीर्ण अंगणवाड्यांसाठी नवीन इमारतींची मागणी; पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळींचे सिडकोला निवेदन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** गव्हाण गावातील अंगणवाडी क्रमांक १, २, ३ व ४ यांच्या अत्यंत जीर्ण व धोकादायक अवस्थेमुळे या अंगणवाड्यांना जागेसह नवीन इमारती बांधून देण्याची मागणी पनवेल पंचायत समिती सदस्या जिज्ञासा किशोर कोळी यांनी सिडको प्रशासनाकडे केली आहे. यासंदर्भातील निवेदन सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक यांना देण्यात आले असून आमदार प्रशांत ठाकूर आणि आमदार महेश बालदी यांनाही त्याची प्रत सादर करण्यात आली आहे.

जिज्ञासा कोळी यांनी निवेदनात म्हंटले आहे की, गव्हाण गावातील अंगणवाडी क्रमांक १, २, ३ व ४ या इमारती अत्यंत नादुरुस्त झाल्या असून कोणत्याही क्षणी अपघात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे येथील लहान विद्यार्थ्यांच्या



सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. तसेच अंगणवाडी क्रमांक १ व २ समोरील अनधिकृत बांधकामावर सिडकोने १० जून २०२५ रोजी कारवाई केली होती. त्यानंतर २३ फेब्रुवारी २०२६ रोजी निकृष्ट करण्यात आलेल्या बांधकामाचे काही अवशेष अंगणवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिसून आल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. याचा परिणाम अंगणवाडीच्या पटसंख्येवरही झाल्याचे जिज्ञासा कोळी यांनी निवेदनात केले. याशिवाय अंगणवाडीलगत असलेल्या अनधिकृत इमारतीवर २५ मे रोजी करण्यात आलेल्या कारवाईदरम्यान इमारतीचे काही भाग अंगणवाडीच्या पत्र्यावर पडल्याने पत्रे फुटली आहेत. त्यामुळे पावसाळ्यात अंगणवाडीत पावसाचे पाणी गळण्याची शक्यता निर्माण झाली असून विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागू शकतो.या पार्श्वभूमीवर सिडकोच्या अभियंत्यांकडून तात्काळ पाहणी करून गव्हाण गावातील अंगणवाडी क्रमांक १, २, ३ व ४ साठी सिडको विकास निधीतून जागेसह नवीन इमारती उभारण्यात याव्यात, अशी मागणी जिज्ञासा कोळी यांनी केली आहे.

zदरम्यान, या प्रश्नाची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा स्थानिक नागरिक आणि पालकांकडून व्यक्त केली जात आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# पत्रकार संतोष भुतेकर यांच्यावरील हल्ल्याचा निषेध

## मंठा पत्रकार बांधवांचे पोलीस प्रशासनाला निवेदन

**दैनिक युवक आधार**

**मंठा | प्रतिनिधी नामदेव मंडपे** : दैनिक जगाचा जगमित्रचे संपादक संतोष भुतेकर यांच्यावर गुटखा माफियांनी केलेल्या भ्याड हल्ल्याचा मंठा येथील पत्रकार बांधवांच्या वतीने तीव्र निषेध करण्यात आला. या घटनेच्या निषेधार्थ पत्रकारांनी मंठा पोलीस ठाण्यात जाऊन पोलीस निरीक्षक पुरुषोत्तम देशमुख यांना निवेदन सादर केले. तसेच आरोपींवर पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

निवेदनात नमूद करण्यात आले की, अवैध धंद्यांविरोधात वृत्तांकन करणाऱ्या पत्रकारांवर हल्ले होणे ही अत्यंत गंभीर व लोकशाहीविरोधी बाब आहे. समाजातील गैरप्रकार उघडकीस आणण्याचे काम करणाऱ्या पत्रकारांवर अशा प्रकारे हल्ले होत असतील, तर ते लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावरच आघात असल्याचे पत्रकारांनी म्हटले आहे.

यावेळी पत्रकारांच्या सुरक्षेसाठी पत्रकार संरक्षण कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करावी तसेच संबंधित आरोपींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. अवैध गुटखा विक्री करणाऱ्या माफियांविरुद्ध




पोलिसांनी तातडीने कारवाई करावी, अन्यथा मंठा तालुक्यातील पत्रकार बांधवांच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

यावेळी हरिराम तिवारी (बाबुजी), पंडित बोराडे, नागेश कुलकर्णी, कृष्णा भावसार, संतोष दायमा, राजेभाऊ भुतेकर, प्रदीप देशमुख, दिनेश जोशी, बालाजी कुलकर्णी, डॉ. आशिष तिवारी, अनिल खंदारे, रणजीत बोराडे, रवी भावसार, रमेश देशपांडे, अतुल खरात, डॉ. शबाब बागवान, गजानन माळकर, सुरेश दवणे, मानसिंह बोराडे, जीवन काळे, संदीप गायकवाड, महादेव पाखरे, रवी बोराडे, जगदीश राठोड, आसाराम शेळके, विशाल वायाळ, शुभम बोराडे, दिलीप हिवाळे नामदेव मंडपे.यांच्यासह मोठ्या संख्येने पत्रकार बांधव उपस्थित होते.

# SMF ने कारण नसताना उत्कृष्ट काम करणाऱ्या तालुका समन्वयकाला पदावरून हटवले

## ( तालुक्यातील शिक्षक वर्गात तीव्र नाराजी)

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी कळमनुरी** : तालुक्यात शिक्षण क्षेत्रात आपल्या उल्लेखनीय आणि उत्कृष्ट कामगिरीने अल्पावधीतच आदर्श निर्माण करणाऱ्या विजय खुडे तालुका समन्वयकाला (Taluka Coordinator) कोणत्याही सबळ कारणाशिवाय अचानक पदावरून तडकाफडकी काढून टाकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या अन्यायकारक निर्णयामुळे तालुक्यातील शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षणप्रेमींमधून तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

विजय खुडे तालुका समन्वयक हे गेल्या काही काळापासून तालुक्यातील शांतीलाल मुथा फाउंडेशन पुणे द्वारा मूल्यवर्धन शैक्षणिक दर्जा सुधारण्यासाठी, शिक्षकांना सहकार्य करण्यासाठी आणि SMF व महाराष्ट्र शासन यांचे द्वारा मूल्यवर्धन उपक्रम तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी अत्यंत प्रामाणिकपणे कार्यरत व जिल्ह्यात परिचित होते. त्यांच्या कार्यकाळात तालुक्याने मूल्यवर्धन ची मोलाची प्रगती शिक्षकयांच्या सहकार्या ने केली आहे . असे असतानाही, SMF वरिष्ठ पातळीवरून जिल्हा समन्वयक व राज्य समन्वयक यांनी एकही भेट तालुक्यात दिली नाही. व तालुक्यातील मूल्यवर्धन ची प्रगती सुद्धा बघितली नाही व अचानक तालुका समन्वयक यांचे कामाची पाहणी न करता अचानक पदावरून कार्यमुक्त करण्यात आले. विशेष म्हणजे, हा निर्णय घेण्यापूर्वी त्यांना कोणतीही पूर्वकल्पना किंवा कारणे दाखवा नोटीस (Show Cause Notice) देण्यात आली नसल्याची माहिती तालुका समन्वयक यांचे कडून मिळाली आहे.

**शिक्षकांमध्ये तीव्र असंतोष**

नेहमीच शिक्षकांना खंबीरपणे सहकार्य करण्यासाठी उभे राहणाऱ्या आणि कामात पारदर्शकता ठेवणाऱ्या एका कर्तव्यदक्ष समन्वयक यांचे वर अशा प्रकारे अन्याय झाल्याने शिक्षक नाराज झाले असल्याचे कळते

"जे कर्मचारी चांगलं काम करतात, त्यांना प्रोत्साहन देण्याऐवजी अशा प्रकारे

> **कळमनुरी तालुक्यातील एकूण 15केंद्रातील केंद्र प्रमुख व व तालुक्यातील आता पर्यत 210 शाळांना भेटी देऊन शिक्षक यांनी उत्कृष्ट मूल्यवर्धन उपक्रम राबविले असून संबंधिक मुख्याध्यापक यांना विचारणा करून SMF यांनी निर्णय घेणे अपेक्षित होते**
>
> **विजय खुडे**
> **माजी तालुका समन्वयक कळमनुरी**

बळी ठरवून काढून टाकणे दुर्दैवी आहे. यामुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे खच्चीकरण होत आहे," अशी संतप्त प्रतिक्रिया केंद्र प्रमुख व मुख्याध्यापक देत आहेत

SMF ने तालुक्यातील मूल्यवर्धन उपक्रम प्रगती पाहून निर्णय घेणे अपेक्षित होते ज्यांनी एकही भेट दिली नाही त्यांच्या निर्णया मुळे उत्कृष्ट वेक्तीला डावलने हे फाऊंडेशन प्रशासनाने करणे चुकीचे वाटते

तालुक्यातील शैक्षणिक वातावरणावर विपरित परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जर या उत्कृष्ट काम करणाऱ्या तालुका समन्वयकाला सन्मानाने पुन्हा त्याच पदावर रुजू करून घेतले नाही, तर तालुक्यातील सर्व शिक्षक संघटना एकत्र येऊन , मूल्यवर्धन उपक्रम घेण्यासाठी करावे तसें सहकार्य मिळणे अपेक्षित नसणार आहे.व SMF यांचे वरिष्ठ असणारे जिल्हा पातळी वरील कर्मचारी यांनी येन वेळेवर कामावर नसणार आहेत असं सांगितलं त्या मुळे वेळेवर जॉबलेस केल्या मुळे वेळेवर काय करायचे काही दिवसात शाळा सुरु होणार त्या पदतीने समन्वयक यांनी तयारी केली आहे. पण या निर्णयामुळे समन्वयक यांचे वर उपास मारीची वेळ आली आहे. वरिष्ठ यांना पैसे दिले नसल्याने तर? समन्वयक यांना कमी केले नसेल न? असा अंदाज दर्शवीला जात आहे

# पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांची दमदार कामगिरी! अवघ्या २५ दिवसांत घरफोडीचा छडा; ४.५४ लाखांचा १०० टक्के मुद्देमाल हस्तगत!

## पुण्यात लपलेल्या चोरट्याला शिताफीने जेरबंद; तांत्रिक तपास, गुप्त माहिती आणि पोलिसी कौशल्यामुळे मोठे यश

**दैनिक युवक आधार**

**वाशीम करण धोंगडे जिल्हा प्रतिनिधी** : येडशी (मंगरुळपीर/वाशिम) येथे घडलेल्या घरफोडीच्या गाजलेल्या प्रकरणाचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेने पुन्हा एकदा आपल्या कार्यक्षमतेची चुणूक दाखवून दिली आहे. घराचा दरवाजा तोडून तब्बल ४ लाख ५४ हजार रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने लंपास करणाऱ्या आरोपीला अवघ्या २५ दिवसांत अटक करून चोरीला गेलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात पोलिसांना यश आले आहे. या धडाकेबाज कारवाईमुळे जिल्ह्यातील नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास आणखी दृढ झाला आहे.

११ मे २०२६ रोजी रात्रीच्या सुमारास येडशी येथील अश्विनी प्रवीण तायडे यांच्या घरात अज्ञात चोरट्याने प्रवेश करून कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने चोरून नेले होते. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी १२ मे रोजी मंगरुळपीर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. घरफोडीतील मुद्देमालाची मोठी रक्कम आणि घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेने या प्रकरणाचा तपास युद्धपातळीवर सुरू केला.

पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांच्या नेतृत्वाखाली विशेष पथकाची




स्थापना करण्यात आली. तपासादरम्यान पोलिसांनी घटनास्थळ परिसरातील सीसीटीव्ही फुटेज बारकाईने तपासले. तसेच तांत्रिक पुरावे, मोबाईल लोकेशन आणि गोपनीय माहितीच्या आधारे संशयितांचा शोध सुरू ठेवला. या तपासातून येडशी येथीलच रहिवासी संघदीप चंदू वानखडे हा या घरफोडीमागील मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाले.

दरम्यान आरोपी गुन्हा करून पुणे येथे फरार झाल्याची खात्रीशीर माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने कोणताही विलंब न लावता पुण्याकडे धाव घेतली. अनेक दिवसांच्या शोधमोहीमेनंतर पोलिसांनी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने सापळा रचत आरोपीला ताब्यात घेतले. आरोपीची कसून चौकशी केली असता त्याने घरफोडीची कबुली दिली.

चौकशीदरम्यान आरोपीने चोरीतील दागिने शेलू बाजार येथील दोन सोनारांना विकल्याचे सांगितले. त्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ शेलू बाजार येथे जाऊन पंचासमक्ष कारवाई केली. या कारवाईत ५२ ग्रॅम सोने आणि ४२ ग्रॅम चांदी असा एकूण ४ लाख ५४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. विशेष म्हणजे चोरीला गेलेला संपूर्ण मुद्देमाल परत मिळविण्यात पोलिसांना यश आले असून ही बाब अत्यंत उल्लेखनीय मानली जात आहे.

घरफोडीसारख्या गंभीर गुन्ह्याचा अल्पावधीत उलगडा करून आरोपीला अटक करणे आणि चोरीला गेलेला १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करणे ही मोठी कामगिरी मानली जात आहे. या यशामुळे स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासकौशल्याची पुन्हा एकदा प्रचिती आली असून जिल्हाभरातून या कारवाईचे कौतुक होत आहे.

> **घरफोडीच्या घटनेनंतर स्थानिक गुन्हे शाखेने केवळ गुन्हा दाखल करून थांबण्याऐवजी तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज, गोपनीय माहिती आणि आरोपीच्या हालचालींचे बारकाईने विश्लेषण केले. त्यामुळे आरोपी पुण्यात लपून बसला असतानाही त्याचा अचूक माग काढणे शक्य झाले. अवघ्या २५ दिवसांत गुन्हा उघड करून चोरीचा संपूर्ण मुद्देमाल हस्तगत करणे ही जिल्हा पोलिसांसाठी मोठी उपलब्धी मानली जात आहे.**
>
> **— पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी**

ही उल्लेखनीय कारवाई वाशिम जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड आणि उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक प्रदीप परदेशी, मंगरुळपीरचे पोलीस निरीक्षक किशोर शेळके, पोउपनि निलेश जाधव, पोहवा महेश वानखडे, गोपाल चौधरी आणि शाम इंगळे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

# शहानूर प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचणार कधी?

## कालव्यांवरील कोट्यवधींचा खर्च ठरतोय व्यर्थ

**दैनिक युवक आधार**

**अंजनगाव सुर्जी संतोषराव घोडेराव** : अंजनगाव सुर्जी तालुक्यासाठी वरदान ठरलेला शहानूर प्रकल्प सध्या शासन आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे चर्चेत आला आहे. प्रकल्पात पुरेसा पाणीसाठा असूनही नियोजनाच्या अभावामुळे शेतकऱ्यांना त्याचा अपेक्षित लाभ मिळत नसल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, एकीकडे प्रकल्पाच्या कालव्यांच्या दुरुस्तीवर शासनाकडून कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च केला जात असताना, दुसरीकडे प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहोचत नसल्याने हा सर्व खर्च पाण्यात जात असल्याची संतप्त प्रतिक्रिया शेतकरी व्यक्त करत आहेत. शहानूर प्रकल्पाच्या कालव्यांवर दरवर्षी देखभालीच्या नावाखाली मोठा निधी खर्च केला जातो. मात्र, अनेक ठिकाणी हे कालवे फुटलेले आहेत, तर कुठे गाळ साचल्याने पाणी पुढे सरकत नाही. प्रशासकीय पातळीवर यावर केवळ वरवरची मलमपट्टी केली जात असल्याचा आरोप होत आहे. प्रकल्पात पाणी शिल्लक नसताना किंवा पाण्याचे नियोजन नसताना कालव्यांच्या सिमेंट सोंडणीवर खर्च करणे म्हणजे सरकारी तिजोरीची लूट असल्याचा प्रश्न शेतकरी उपस्थित करत आहेत.

आजच्या काळात सिंचनासाठी 'बंदिस्त पाइपलाइन' हे सर्वात प्रभावी माध्यम मानले जाते. कालव्याद्वारे पाणी सोडल्यास बाष्पीभवन आणि गळतीमुळे मोठ्या प्रमाणावर पाण्याचा अपव्यय होतो. याउलट, जर शासनाने कालव्यांवरील खर्च



**पाइपलाइनची मागणी ऐरणीवर**

थांबवून तोच निधी पाइपलाइन टाकण्यासाठी वापरला असता, तर आज तालुक्यातील हजारो हेक्टर जमीन ओलिताखाली आली असती. पाइपलाइनमुळे शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यालाही शाश्वत पाणी मिळाले असते.जेव्हा प्रकल्पात पाणी नसते, तेव्हा कालव्यांचे काम करून काय साध्य होणार?" असा रोकडा सवाल शेतकऱ्यांनी विचारला आहे. शासनाने जुन्याच पद्धतीवर लाखो-कोटी रुपये खर्च करण्यापेक्षा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पाइपलाइनद्वारे सिंचन सुविधा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी आता जोर धरत आहे.

अंजनगाव सुर्जी तालुक्यातील शेतकरी आधीच निसर्गाच्या लहरीपणाने होरपळला आहे. अशात प्रशासकीय अनास्थेमुळे हक्काचे पाणी मिळत नसेल, तर या प्रकल्पाचा उपयोग काय? आता तरी शासन याकडे गांभीर्याने बघून पाइपलाइनच्या मागणीचा विचार करणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# स्व. माणिक पोदार स्कूलच्या रिधिमा देशमुखची 'जेईई' परीक्षेत उत्तुंग भरारी!

## 'जेईई ॲडव्हान्स'मध्ये मिळवला ८५५३ वा रँक; शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा

**दैनिक युवक आधार**

**रिसोड : तालुका प्रतिनिधी.. रणजितसिह.ठाकूर** : गुणवत्ता आणि दर्जेदार शिक्षणाचा वस्तुपाठ घालून देणाऱ्या स्थानिक स्व. माणिक पोदार लर्न स्कूलने शैक्षणिक क्षेत्रात पुन्हा एकदा आपली उज्ज्वल परंपरा सिद्ध केली आहे. शाळेची अत्यंत हुशार आणि जिद्दी विद्यार्थिनी कु. रिधिमा देशमुख हिने देशातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या 'जेईई' आणि बारावी बोर्ड परीक्षेत मिळवलेल्या उत्तुंग यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. तिच्या या यशाने संपूर्ण रिसोड शहर व वाशीम जिल्ह्यात व परिसरात पोदार स्कूलचा डंका वाजला आहे.

**'जेईई' परीक्षेत कौतुकास्पद कामगिरी**

अभियांत्रिकी क्षेत्रातील देशातील सर्वोच्च संस्था म्हणजेच आयआयटी प्रवेशासाठी आवश्यक असलेल्या 'जेईई मेन्स' परीक्षेत रिद्धीमाने ९८.०७ पर्सेंटाईल गुणांची नेत्रदीपक कमाई केली. या यशाच्या जोरावर तिने अत्यंत आव्हानात्मक मानल्या जाणाऱ्या 'जेईई ॲडव्हान्स' परीक्षेतही आपली घोडदौड कायम ठेवत, अखिल भारतीय पातळीवर ८५५३ वा रँक पटकावला. तिच्या या यशामुळे देशातील नामांकित आयआयटी संस्थेमध्ये प्रवेश मिळवण्याचा तिचा मार्ग मोकळा झाला आहे.

> **"माझ्या या यशाचे श्रेय माझे आई-वडील आणि स्व. माणिक पोदार स्कूलच्या सर्व शिक्षकांना जाते. शाळेने करून घेतलेली तयारी आणि दिलेल्या पाठिंब्यामुळेच मी या कठीण परीक्षेत तणावमुक्त राहून यश मिळवू शकले. भविष्यात उत्तम अभियंता होऊन देशाची सेवा करण्याचा माझा मानस आहे."**
>
> **– कु. रिधिमा देशमुख (गुणवंत विद्यार्थिनी**

**बोर्ड परीक्षेतही गुणवत्तेचा ठसा**

स्पर्धा परीक्षेची अत्यंत कठीण तयारी करत असतानाच, रिधिमाने आपल्या शालेय अभ्यासाकडेही दुर्लक्ष होऊ दिले नाही. नुकत्याच जाहीर झालेल्या बारावी बोर्ड परीक्षेत तिने ८९% गुण मिळवून विज्ञान शाखेत उत्कृष्ट यश संपादन केले. स्पर्धा परीक्षा आणि बोर्ड परीक्षा या दोन्ही आघाड्यांवर तिने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी अत्यंत प्रेरणादायी ठरणारे आहे.

**कठोर परिश्रम आणि 'पोदार पॅटर्न'चे फलित**

रिधिमाने मिळवलेले हे यश म्हणजे तिची अहोरात्र मेहनत, जिद्द आणि स्व. माणिक पोदार स्कूलच्या शिक्षकांचे योग्य नियोजनबद्ध मार्गदर्शन यांचे हे फलित आहे. शाळेमध्ये नियमित घेतल्या जाणाऱ्या चाचण्या, शंका निरसन सत्रे आणि विद्यार्थ्यांच्या मानसिक तयारीवर दिला जाणारा भर यामुळेच हे यश शक्य झाल्याचे बोलले जात आहे.

**सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव**

रिधिमा देशमुखच्या या देदीप्यमान यशाबद्दल शाळेचे संचालक, प्राचार्य, सर्व शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी तिचे कौतुक केले. एकाच वेळी जेईई मेन्स, ॲडव्हान्स आणि बारावीत अव्वल येणाऱ्या रिधिमा सध्या रिसोड आणि वाशिम परिसरातील सामाजिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांकडून कौतुकाचा आणि शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# ठाणेदार आदिनाथ मोरे यांच्या नेतृत्वाखाली अवैध हातभट्टी दारू अड्ड्यावर धडक कारवाई

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्स्ना करवाडे विदर्भ संपादिका जानेफळ (बुलढाणा)** : ३ जून जिल्ह्यात अवैध दारू निर्मिती व विक्रीविरोधात सुरू असलेल्या मोहिमेला अधिक गती देत पोलीस स्टेशन जानेफळचे ठाणेदार आदिनाथ मोरे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी ग्राम पाथर्डी येथे मोठी कारवाई केली. या कारवाईत अवैध हातभट्टी दारू निर्मितीचा अड्डा उद्ध्वस्त करण्यात आला असून १२ हजार ८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच एका आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलीस स्टेशन जानेफळचे ठाणेदार आदिनाथ मोरे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर परिसरातील अवैध धंद्यांविरोधात सातत्याने मोहीम उघडली असून कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी कठोर पावले उचलली जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून पोलिसांना ग्राम पाथर्डी येथे अवैधरित्या हातभट्टी दारू तयार करून तिची साठवणूक केली जात असल्याची गोपनीय माहिती प्राप्त झाली होती.माहितीची खातरजमा करून ठाणेदार आदिनाथ मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाची स्थापना करण्यात आली. पथकाने ३ जून रोजी सायंकाळी अचानक छापा टाकत कारवाई केली. पोलिसांच्या या अचानक धाडीमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ

**पाथर्डी येथे १२,८२० रुपयांचा मुद्देमाल जप्त; एका आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल!**
**अवैध दारू व्यवसायाविरोधात पोलिसांचा कठोर बडगा; नागरिकांनी माहिती देण्याचे आवाहन**

> **"अवैध दारू निर्मिती, साठवणूक व विक्री करणाऱ्यांविरोधात कोणतीही तडजोड केली जाणार नाही. अशा बेकायदेशीर व्यवसायांवर सातत्याने धडक कारवाया सुरू राहतील. नागरिकांनी अशा प्रकारच्या अवैध कृत्यांची माहिती पोलिसांना द्यावी. माहिती देणाऱ्यांची ओळख गोपनीय ठेवण्यात येईल."**
>
> **– आदिनाथ मोरे**
> **ठाणेदार, पोलीस स्टेशन जानेफळ**

उडाली.कारवाईदरम्यान दत्ता उत्तम चव्हाण (वय ५२ वर्षे, रा. पाथर्डी, ता. मेहकर) याच्या ताब्यातून आणि परिसरातून अवैध दारू निर्मितीसाठी वापरण्यात येणारे साहित्य जप्त करण्यात आले. यामध्ये ९ लिटर हातभट्टी दारू, प्लास्टिक कॅन, २३० लिटर गुळमिश्रित मोह सडवा तसेच १६ टरपी पीपे यांचा समावेश आहे. जप्त करण्यात आलेल्या साहित्याची एकूण किंमत रु. १२,८२० इतकी आहे.या प्रकरणी अपराध क्रमांक १८१/२०२६ नोंदविण्यात आला असून आरोपीविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम कलम ६५(फ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे परिसरातील अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये धास्ती निर्माण झाली आहे.विशेष म्हणजे, ठाणेदार आदिनाथ मोरे यांच्या नेतृत्वाखाली अलीकडच्या काळात विविध अवैध धंद्यांवर सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. त्यामुळे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर पोलिसांची बारीक नजर असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे. नागरिकांच्या आरोग्याला आणि समाजाच्या सुरक्षिततेला धोका निर्माण करणाऱ्या अवैध हातभट्टी दारू व्यवसायाविरोधात पोलिसांनी शून्य सहनशीलतेची भूमिका घेतली असल्याचे या कारवाईतून दिसून आले.या यशस्वी कारवाईत पोलीस उपनिरीक्षक संतोष जाधव, पोलीस हेड कॉन्स्टेबल अतुल पवार व पोलीस कॉन्स्टेबल विष्णू जगताप यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष जाधव करीत आहेत.

# एमएमआरडीए केएससीनवनगर (तिसरी मुंबई) विरोधी समिती

## सरकारचे धोरण हुकुमशाही पध्दतीचे : सुधाकर पाटील

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी** : उरण-पनवेल-पेण तालुक्यातील 124 गावांत केएससी नवनगर या नावाने तिसरी मुंबई उभारण्यासाठी राज्य सरकारने 4 मार्च 2024 रोजी अधिसूचना प्रसिद्ध केली. त्यास या 124 गावांतील सुमारे पंचवीस हजार शेतकर्यांनी लेखी हरकती दाखल करून आपला विरोध दर्शविला होता. परंतु सरकारने त्या हरकतींची कुठल्याही प्रकारे दखल न घेता, 16 मार्च 2026 रोजी शासन निर्णय प्रसिद्ध करून शेतकर्यांच्या जमीनी 22.5% ची फसवी योजना लागू करून संमतीने घेण्याचा निर्णय घेतला आहे.

सरकारचे हे धोरण हुकुमशाही पध्दतीचे आणि लोकशाही प्रणालीच्या विरोधी आहे. ही योजना म्हणजे शेतकर्यांना बिल्डर लॉबीच्या दावणीला बांधणारी आणि त्यांना देशोधडीला लावणारी आहे. शेतकर्यांनी या योजनेस तिव्र आक्षेप घेतला असून कोणीही या योजनेस संमती देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. संघटनेने दि 05-02-2025, 23-02-2026 आणि 30-03-2026 च्या निवेदनांद्वारे राज्याचे मुख्यमंत्री आणि नगरविकास मंत्री यांना निवेदने सादर करून सरकारच्या एकतर्फी निर्णयास विरोध केला आहे व आमचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी विनंती केली आहे. परंतु सरकारने आजपर्यंत आमच्या या निवेदनास प्रतिसाद दिलेला नाही. शेतकर्यांचे म्हणणे ऐकून न घेण्याइतपत सरकार दुराग्रही असेल तर शेतकर्यांना आपल्या भावना सनदशीर मार्गाने जाहीरपणे व्यक्त करण्याचा अधिकार आहे.

आता कुठल्याही परिस्थितीत या प्रकल्पासाठी जमीनी न देण्याचा आणि या प्रकल्पाचे काम बंद पाडण्याचा निर्णय 124 गावांतील शेतकर्यांनी घेतला आहे. या पार्श्वभूमीवर, तिसरी मुंबई विरोधी आंदोलन अधीक तीव्र करण्याच्या हेतुने रविवार दि 7 जून 2026 रोजी संध्याकाळी पाच वाजता चिरनेर, ता. उरण येथील ऐतिहासिक हुतात्मा स्मारकाच्या प्रांगणात माजी न्यायमूर्ती बी.जी. कोळसेपाटील यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली भव्य शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. 2006 साली याच तीन तालुक्यातील 45 गावांवर एसईझेडचा प्रकल्प लादण्यात आला होता. त्या प्रकल्पाला रायगड जिल्ह्यातून हद्दपार करण्यातही माजी न्यायमूर्ती कोळसेपाटील एक प्रमुख मार्गदर्शक होते.त्यांच्याच मार्गदर्शनाखाली शेतकरी मेळाव्यात सरकारच्या विरोधात पुढील दिशा ठरवण्यात येईल. असे स्नघ्टनेचे अध्यक्ष सुधाकर पाटील,यांनी सांगितले

असून या मेळाव्यास शेतकर्यांनी मोठया संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन कार्याध्यक्ष संतोष ठाकूर, सरचिटणीस रूपेश पाटील, यांनी केले आहे

# साहेबराव कांबळे यांच्या बंडखोरीविरोधात काँग्रेस आक्रमक; उमरखेडमध्ये तीव्र निषेध, पक्षातून हकालपट्टी!

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : एखाद्या राष्ट्रीय पक्षाच्या अधिकृत उमेदवाराने ऐनवेळी माघार घेणे, हा केवळ त्या पक्षाचाच नव्हे तर मतदार आणि जिल्ह्यातील नागरिकांचा घोर अपमान आहे. काँग्रेसचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी पक्षाला अंधारात ठेवून उमेदवारी मागे घेतल्याच्या निषेधार्थ येथील महात्मा गांधी चौकात महाविकास आघाडी व काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध सभा घेण्यात आली.



या सभेत बोलताना काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन नाईक यांनी सत्ताधाऱ्यांवर कडाडून टीका केली. "कांबळे यांनी उमेदवारी मागे घेण्यामागे सत्ताधाऱ्यांचा थेट हात असून, सत्ताधाऱ्यांनी लोकशाहीचा खून केला आहे," असा थेट आरोप त्यांनी केला. ते पुढे म्हणाले की, "सत्ताधारी देशातील व राज्यातील लोकशाही संपवण्याचा प्रयत्न करत आहेत. ही घटना केवळ यवतमाळ जिल्ह्यापुरती मर्यादित नसून महाराष्ट्रातील पाच जिल्ह्यांमध्ये असाच प्रकार घडला आहे. अनेक उमेदवार पक्षाशी संपर्क न साधता माघार घेऊन सत्ताधाऱ्यांच्या मांडीवर जाऊन बसत आहेत. यामुळे भविष्यात सामान्य माणसाला मतदानाचा अधिकार राहील की नाही, अशी भीती निर्माण झाली आहे." या कृत्यामुळे संविधानाची हत्या करणाऱ्या सरकारचा निषेध करत काँग्रेस कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

काँग्रेसचे माजी प्रदेश सरचिटणीस तातू देशमुख यांनीही साहेबराव कांबळे यांच्यावर तीव्र शब्दांत निशाणा साधला. "काँग्रेस पक्षाने गेल्या काही वर्षांत कांबळे यांना विविध पदे दिली, उमरखेड विधानसभेची उमेदवारी दिली आणि आता विधान परिषदेचीही उमेदवारी दिली. असे असतानाही त्यांनी मतदारांचा व पक्षाचा विश्वासघात केला आहे. त्यांच्यावर पक्ष कडक कारवाई करेलच," असे देशमुख म्हणाले.

माजी जि. प. सभापती राम देवसरकर यांनीही या घटनेचा निषेध नोंदवत पक्षाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी वरिष्ठ पातळीवर केली. "कांबळे यांना मतदारांचे आकडे शेवटच्या क्षणी कळाले का? आकडेवारी तर सहा महिन्यांपूर्वीच ठरली होती. पक्षाचा 'एबी फॉर्म' सोबत असताना अशी माघार घेणे अत्यंत चुकीचे व अक्षम्य आहे," असे देवसरकर यांनी नमूद केले.

याप्रसंगी विकास आघाडीचे सतीश नाईक, संदीप ठाकरे, काँग्रेस तालुका कमिटी अध्यक्ष दत्तराव शिंदे, काँग्रेस शहराध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल, नगरसेवक गनी अली शाह, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) चे स्वप्नील कनवाळे यांच्यासह महाविकास आघाडीतील विविध मान्यवरांनी आपल्या भावना व्यक्त करत निषेध नोंदवला.

या निषेध सभेला भास्कर पंडागळे, नगरपालिकेचे माजी उपाध्यक्ष जुबेर कुरेशी, न.पा. सभापती प्रकाश शिकारे, न.पा. सभापती वीरेंद्र खंदारे, नगरसेवक गणेश खंदारे, राजू कवाणे, देवानंद भारती यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक नेते,

पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अखेर कांबळे यांची काँग्रेसमधून हकालपट्टी!**

**यवतमाळ विधान परिषद मतदारसंघासाठी काँग्रेसची उमेदवारी मिळाल्यानंतर, पक्षनेतृत्वाला विश्वासात न घेता उमेदवारी अर्ज मागे घेतल्यामुळे साहेबराव कांबळे यांच्यावर पक्षश्रेष्ठींनी तात्काळ कारवाई केली आहे. कांबळे यांचे काँग्रेस पक्षाचे प्राथमिक सदस्यत्व रद्द करण्यात आले आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे वरिष्ठ उपाध्यक्ष ॲड. गणेश पाटील यांनी ५ जून रोजी अधिकृत पत्र जारी करून ही माहिती दिली. प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या आदेशानुसार कांबळे यांना पक्षातून निलंबित करण्यात आले असून, त्यांच्या या आत्मघातकी कृत्यामुळे पक्षाची मोठी कोंडी झाल्याचे या पत्रात स्पष्ट करण्यात आले आहे.**

# रायगड राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांची बदली करा; रायगड वासीयांची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, ( वार्ताहर ) :** प्रशासकिय कामात दिंरगाई चालढकल पणा करणे लोकप्रतिनिधी व वरीष्ठांच्या आदेशा कडेही कानाडोळा करणे अशा वृत्तीमुळे दप्तर दिरंगाई नुसार राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्यावर शासनाने त्वरीत कारवाईचा वडगा उगारून निष्क्रीय अधिक्षक यांची त्वरीत रायगडातुन बदलीचे आदेश काढावे अशी मागणी रायगड वासीयांतुन होत आहेमी कामात फार कामात मग्न असल्याचा आव आणुन रायगड जिल्ह्यात पनवेलसह,पेण ,उरण,अलिबाग , मुरूड,रोहा तालुक्यात गावठी दारूचा बेकायदेशीर धंदा सुसाट सुरू असताना गारंबी,गोपाळवाटच्या परीसरात विविध गावात हातभट्ट्या मोठ्या प्रमाणात आहेत त्यातच मसाडी, बेलवाडी, टिटवी, पारगाण, नागशेत आदी भागात हातभट्या सुरू आहेत असा नागरीकांचा आरोप आहे वरील हाथभट्याची गावठी दारू रायगडच्या विविध भागात सप्लाय केली जाते याबाबत यांना आळा घालण्याचे काम राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांचे असताना ते मात्र या बाबीकडे गांभीर्याने घेत नाही याचे नागरीकांतुन आश्चर्य व्यक्त केले जात आहे या बाबत कर्तव्यदक्ष राज्य उत्पादन शुल्क मंत्री महोदय सुनेत्रा ताई पवार यांनी सदर गंभीर बाबींकडे गार्भीयाने पाहुन अधिक्षक यांची त्वरीत उचलबांगडी करून रायगड वासीयांना व व्यावसाईकांना दिलासा द्यावा अशीही मागणी जोर धरू लागली आहे राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांच्या कार्यक्षेत्रातील वाइन शॉप, परमिट रूम यांचे परवाने नुतनिकरण 31 मार्च पर्यंत करणे बंधनकारक असल्याचा शासन निर्णय आहे त्या नुसार सबंधीत मालक, चालक आपले परवाने लवकरात लवकर नुतनीकरण व्हावे या हेतुने सर्व कागदपत्रे दप्तर तपासणी वेळीच करून स्टेट बॅकेत चलन भरून आपला व्यवसाय ज्या ठिकाणी आहे तेथील तालुक्याच्या ठिकाणी असलेले राज्य उत्पादन शुल्क तालुका कार्यालयात संपुर्ण नुतनिकरणाचे कामकाज पुर्ण करतात तालुका राज्य उत्पादन शुक्ल अधिकारी अत्यंत कामसु चांगले अधिकारी कर्मचारी असल्याने परवाने नुतनीकरण बाबत संबधीत विविध फाईल्स ह्या राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्याकडे त्या पुढे पाठविल्या जातात परंतु नुतनिकरणाकरीता आलेल्या फाईल्स मध्ये काहीतरी क्युरी काढुन संबधीत परमिट रूम वाईन्सशॉप व ईतर व्यावसाईकांनी मुख्य साहेबांची सदिच्छा भेट घेतल्याशिवाय त्यांच्या नुतनिकरणाच्या फाईल्स वर साहेब स्वाक्षरी करीतच नाहीत असा आरोप रायगड जिल्ह्यातील चालक मालक खाजगीत बोलत आहेत ? या बाबत वरीष्ठ अधिकारी यांनी या प्रकरणाची दखल घेऊन दोन वर्षे चालु असलेली आमची पिळवणुकीवर थांबवावी व या ठिकाणी एक चांगला कामसु अधिकारी शासनाने नियुक्त करावा अशी मागणी जोर धरू लागली आहे

# जिजाऊ पुण्यतिथीनिमित्त शिंदखेडराजा ते पाचाड वारी; सोयगावात नियोजन बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**सोयगाव तालुका प्रतिनिधी विजय काळे** : राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त दिनांक १५ जून ते १७ जून २०२६ दरम्यान शिंदखेडराजा ते पाचाड अशी भव्य वारी आयोजित करण्यात आली असून,या वारीच्या नियोजनासाठी सोयगाव शहरातील समाजसेवक तुकाराम शेठ यांच्या निवासस्थानी महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.बैठकीत राजमाता जिजाऊंचे शिंदखेडराजा येथील वंशज राजे शिवाजीराव जाधव यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना या वारीचे महत्त्व विशद केले.ते म्हणाले की, राजमाता जिजाऊ यांनी स्वराज्याचे स्वप्न पाहून छत्रपती शिवाजी महाराजांना राष्ट्रप्रेम,न्याय आणि स्वाभिमानाचे संस्कार दिले. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ आयोजित करण्यात आलेली ही वारी केवळ एका समाजापुरती मर्यादित नसून सर्व समाजघटकांना प्रेरणा देणारी आहे.यावेळी त्यांनी विशेष आवाहन



करताना सांगितले की, ही वारी फक्त मराठा समाजाची नसून सर्व समाज,सर्व धर्म आणि सर्व घटकांची आहे.मराठा समाज मोठ्या संख्येने सहभागी होणारच आहे;मात्र इतर समाज बांधवांनीही या ऐतिहासिक व प्रेरणादायी वारीत सहभागी होऊन राजमाता जिजाऊंना अभिवादन करावे.जिजाऊंचे कार्य संपूर्ण समाजासाठी प्रेरणादायी असल्याने या वारीत सर्वांनी एकजुटीने सहभागी व्हावे,असे आवाहन त्यांनी केले.बैठकीस छत्रपती शिवाजी महाराज ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष अशोक शिंदे,किरण बोरसे यांची प्रमुख उपस्थिती होती.तसेच समाजसेवक युवराज वामने, मराठा क्रांती मोर्चाचे तालुका समन्वयक विजय काळे, नगरसेवक बंटीभाऊ काळे, राजुभाऊ दुतोंडे,कृष्णा पाटील,किरणकुमार पाटील, राजेंद्र गव्हाड,योगेश कळवत्रे, शिवाजी दौंड,संतोष सोहणी, शेख सुलेमान,अनिल चौधरी, आबा वामने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत वारीच्या यशस्वी आयोजनासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली.

१७ जून रोजी राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीनिमित्त पाचाड येथे अभिवादन कार्यक्रम होणार असून, सोयगाव शहर व तालुक्यासह सर्व समाजघटकांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन यावेळी करण्यात आले.


बैठकीचे सूत्रसंचालन कृष्णा पाटील यांनी केले,तर आभार प्रदर्शन नगरसेवक राजुभाऊ दुतोंडे यांनी मानले.

# संविधान विरुद्ध जातिवाद : भारताची अपूर्ण लढाई

**दैनिक युवक आधार रायगड**
**प्रतिनिधी :- सचिन पवार**
**माणगांव :-**भारतीय संविधानाला ७५ वर्षांहून अधिक काळ पूर्ण झाला आहे. देशाने विज्ञान, तंत्रज्ञान, अर्थव्यवस्था आणि जागतिक प्रतिष्ठेच्या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. परंतु एक प्रश्न आजही कायम आहे—भारतीय समाज खरोखरच जातमुक्त झाला आहे का?

आजही निवडणुका जातींच्या गणितावर लढवल्या जातात. उमेदवारांची निवड जातीय समीकरणांवर ठरते.समाजमाध्यमांवर जातीय द्वेषाचे विष पेरले जाते. शिक्षण, रोजगार, विवाह आणि सामाजिक संबंधांमध्ये जात हा घटक प्रभावीपणे कार्यरत आहे. यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यक्त केलेली चिंता आजही तितकीच जिवंत असल्याचे दिसून येते.

डॉ. आंबेडकरांनी १९३६ मध्ये लिहिलेल्या "Annihilation of Caste" या ग्रंथात स्पष्टपणे सांगितले होते की, जात ही केवळ सामाजिक विभागणी नाही तर मानवी स्वातंत्र्य आणि बंधुत्वाला नाकारणारी व्यवस्था आहे. त्यांनी इशारा दिला होता की, जातिव्यवस्था अस्तित्वात असताना लोकशाहीची मुळे कधीच मजबूत होऊ शकत नाहीत.संविधान स्वीकारले, पण संविधानिक मूल्ये स्वीकारली का? भारतीय राज्यघटनेने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाचे अधिकार दिले. परंतु संविधान



स्वीकारणारा समाज संविधानिक मूल्ये स्वीकारण्यात अजूनही मागे आहे. अनेकदा जातीच्या आधारावर माणसाचे मूल्यमापन केले जाते.सामाजिक प्रतिष्ठा, विवाहसंबंध, राजकीय प्रतिनिधित्व आणि आर्थिक संधी यांमध्ये जात अजूनही निर्णायक ठरते.

आज अनेक राजकीय पक्ष सार्वजनिक विचारमंचावर सामाजिक समतेची भाषा करतात; परंतु प्रत्यक्षात जातीय ध्रुवीकरणाच्या राजकारणातूनच आपले राजकीय अस्तित्व टिकवण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे जातीयतेविरुद्धची लढाई केवळ सामाजिक नाही, तर राजकीयदेखील आहे.जातीयतेचे राजकारण : समाजाला कमकुवत करणारा घटक! जातीय अस्मिता आणि सामाजिक न्याय यामध्ये मूलभूत फरक आहे. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे आणि घटनात्मक अधिकारांची मागणी करणे हा सामाजिक न्यायाचा भाग आहे. परंतु जातीच्या नावावर द्वेष, श्रेष्ठत्व किंवा वर्चस्वाची भावना निर्माण करणे हे लोकशाहीविरोधी आहे.

आज काही शक्ती समाजातील विविध अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीय (OBC) समाजांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न करत आहेत. सामाजिक ऐक्य कमकुवत करून राजकीय लाभ मिळवण्याची ही प्रवृत्ती देशाच्या सामाजिक एकात्मतेसाठी धोकादायक आहे.आंबेडकरांचा मार्ग : शिक्षण, संघटन आणि बंधुता डॉ. आंबेडकरांनी जातीयता नष्ट करण्यासाठी तीन मूलभूत शस्त्रे दिली—शिक्षण, संघटन आणि संघर्ष. त्यांनी शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन मानले. कारण शिक्षित समाज प्रश्न विचारतो, अन्यायाविरुद्ध उभा राहतो आणि अंधपरंपरांना आव्हान देतो. त्याचबरोबर त्यांनी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले. त्यांच्या मते, जातिभेदाची भिंत खऱ्या अर्थाने कोसळवायची असेल तर रक्तसंबंध निर्माण झाले पाहिजेत. कायदे भेदभाव रोखू शकतात, परंतु सामाजिक अंतर कमी करण्याचे काम मानवी संबंधच करू शकतात.जातीपेक्षा माणूस मोठा आज गरज आहे ती बाबासाहेबांच्या विचारांकडे नव्याने पाहण्याची. त्यांच्या विचारांचा उपयोग केवळ जयंती, महापरिनिर्वाण दिन किंवा राजकीय भाषणांपुरता मर्यादित ठेवून चालणार नाही. संविधानातील समता, स्वातंत्र्य आणि बंधुता ही मूल्ये प्रत्यक्ष जीवनात उतरवली गेली पाहिजेत.

देशाच्या विकासाचा खरा मापदंड GDP, महामार्ग किंवा गगनचुंबी इमारती नसून समाजातील सर्वात शेवटच्या व्यक्तीला मिळणारा सन्मान आणि समान संधी आहे.जोपर्यंत एखाद्या व्यक्तीला त्याच्या जातीमुळे कमी लेखले जाते, तोपर्यंत *भारताची लोकशाही अपूर्ण राहणार आहे.*

निष्कर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेली सर्वात मोठी शिकवण म्हणजे"मनुष्याला त्याच्या जातीने नव्हे,तर त्याच्या गुणांनी ओळखा."आज देशासमोर उभ्या असलेल्या सामाजिक आव्हानांना उत्तर शोधायचे असेल, तर जातीय ध्रुवीकरण नव्हे तर संविधानिक बंधुता स्वीकारावी लागेल.जातीयतेचे राजकारण तात्पुरते मत मिळवू शकते; परंतु राष्ट्र घडवू शकत नाही. राष्ट्र घडते ते समता, न्याय आणि बंधुत्वाच्या पायावर. म्हणूनच आजचा प्रश्न केवळ जातीयता अस्तित्वात आहे का, हा नाही; तर आपण आंबेडकरांनी दाखविलेल्या जातमुक्त भारताच्या दिशेने खरोखर चाललो आहोत का? हा आहे.अविनाश जाधव

**सामाजिक कार्यकर्ते**
**913055015**

# धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालक, कल्याणकारी मंडळाच्या नाव आणि नियमावलीतील सुधारणा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल प्रतिनिधी** : शासनाच्या गृह विभागाकडील 20 मे 2026 चे शासन शुद्धीपत्रक आणि परिवहन आयुक्त कार्यालयाच्या निर्देशानुसार, राज्यातील ऑटो-रिक्षा व मीटर्ड टॅक्सी चालक/मालकांच्या सामाजिक व आर्थिक कल्याणासाठी स्थापित करण्यात आलेल्या कल्याणकारी मंडळाच्या नावात आणि नियमावलीत शासनाने महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी पनवेल जयंत चव्हाण यांनी दिली आहे.या कल्याणकारी मंडळाचे नाव बदलून आता "धर्मवीर आनंद दिघे साहेब महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक कल्याणकारी मंडळ" असे करण्यात आले आहे. यापूर्वी या मंडळाचे सभासदत्व केवळ ऑटो-रिक्षा आणि मिटर्ड टॅक्सी चालकांपुरतेच मर्यादित होते. मात्र, जास्तीत जास्त वाहन चालकांना विविध सरकारी कल्याणकारी योजना व सुविधांचा लाभ मिळावा या उद्देशाने शासनाने आता याच्या पात्रतेमध्ये मोठी सुधारणा केली आहे. नवीन नियमांनुसार, ऑटो-रिक्षा आणि टॅक्सी चालकांसोबतच, सर्व प्रकारची प्रवासी वाहने चालविणारे आणि वैध 'बॅज' व अनुज्ञप्ती (Driving License) धारक असलेले सर्व चालक या मंडळाचे सभासद होण्यासाठी पात्र ठरले आहेत. सर्व प्रकारच्या प्रवासी वाहनांच्या अधिकृत बॅजधारक चालकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा. मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवण्यासाठी पात्र चालकांनी जास्तीत जास्त संख्येने या कल्याणकारी मंडळाचे सभासद व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# झाडे लावा, झाडे जगवा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल :** जागतिक पर्यावरण दिनानिमित्त रायगड जिल्हा काँग्रेस कमिटी व पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटी पर्यावरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पनवेल तालुक्यातील वलप गाव परिसरातील ओसाड मालरानावर शेकडो वृक्षांचे रोपण करण्यात आले.बदलत्या हवामानाचा विचार करता पर्यावरण संवर्धन व नैसर्गिक संतुलन राखण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. वृक्षारोपणामुळे वातावरण शुद्ध राहण्यास, जैवविविधतेचे संरक्षण करण्यास तसेच भविष्यातील पिढ्यांसाठी हरित परिसर निर्माण करण्यास मदत होणार आहे. यावेळी पनवेल शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी अध्यक्ष सुदाम




पाटील, रायगड जिल्हा विधी विभाग अध्यक्ष ॲड. के. एस. पाटील, पनवेल शहर जिल्हा युवक काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हेमराज म्हात्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामचंद्र पाटील, पाले बुद्रुक ग्रामपंचायत सरपंच गुलजार म्हात्रे तसेच कार्यक्रमाचे आयोजक पनवेल शहर जिल्हा पर्यावरण विभाग अध्यक्ष सुरेश पाटील आणि रायगड जिल्हा पर्यावरण विभाग अध्यक्ष राजीव पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# अशोका बिल्डकॉनकडून रेवदंडा खाडीपुलाची उभारणी; २०२८ पर्यंत कोकणचा प्रवास होणार सुपरफास्ट

## वळसा संपणार, वेळ वाचणार! रेवदंडा खाडीपुलामुळे अलिबाग-मुरूड संपर्काला नवी गती

**दैनिक युवक आधार**

**अलिबाग रेवदंडा निलेश फुंडे प्रतिनिधी** : कोकणच्या विकासाचा सुवर्णसेतू! एमएसआरडीसीच्या १२०० कोटींच्या रेवदंडा खाडीपुलाचे काम वेगात कोकणातील बहुप्रतीक्षित रेवस-रेड्डी सागरी महामार्गावरील रेवदंडा खाडीपुलाच्या उभारणीच्या कामाला आता चांगलाच वेग आला असून, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पामुळे रायगडसह संपूर्ण कोकणच्या विकासाला नवी दिशा मिळणार आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) माध्यमातून या प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यात येत असून, देशातील आघाडीची पायाभूत सुविधा निर्माण करणारी कंपनी अशोका बिल्डकॉन लिमिटेडकडून पुलाचे बांधकाम सुरू आहे. सुमारे १,२०० कोटी रुपयांच्या खर्चातून उभारला जाणारा हा पूल कोकणच्या वाहतूक व्यवस्थेत ऐतिहासिक बदल घडवून आणणार असल्याचे मानले जात आहे.

सध्या चौल आणि रेवदंडा परिसरात पुलाच्या भव्य खांबांच्या उभारणीचे काम युद्धपातळीवर सुरू असून, समुद्रकिनारी भागातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या प्रतीक्षेला अखेर मूर्त स्वरूप येताना दिसत आहे. प्रकल्पाचे काम नियोजित गतीने सुरू राहिल्यास २०२८ अखेरपर्यंत पूल पूर्णत्वास जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

**तीन जिल्ह्यांना जोडणारा विकास महामार्ग**

रेवस-रेड्डी सागरी महामार्ग हा रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या तीन किनारी जिल्ह्यांना जोडणारा सुमारे ४९८ किलोमीटर लांबीचा महत्त्वाचा मार्ग आहे. या महामार्गावर रेवस-करंजा, रेवदंडा, बाणकोट, आगरदांडा, केळशी, कुणकेश्वर आणि जयगड या सात खाड्यांवर मोठे पूल उभारले जात आहेत. या प्रकल्पामुळे कोकणातील किनारी भाग थेट जोडला जाणार असून, दळणवळण अधिक वेगवान आणि सुलभ होणार आहे.

**रेवदंडा खाडीपूल ठरणार विकासाचा प्रमुख दुवा**

रेवदंडा खाडीवरील पूल हा संपूर्ण सागरी महामार्गातील सर्वाधिक महत्त्वाच्या प्रकल्पांपैकी एक मानला जात आहे. सध्या अलिबाग, चौल, रेवदंडा आणि मुरूड परिसरातील नागरिकांना खाडी ओलांडण्यासाठी मोठा वळसा घालावा लागतो. पूल पूर्ण झाल्यानंतर हा अतिरिक्त प्रवास टळणार असून, अलिबाग ते मुरूड आणि रेवदंडा परिसरातील संपर्क व्यवस्था अधिक गतिमान होणार आहे.

नागरिकांचा वेळ



वाचण्याबरोबरच इंधन खर्चातही मोठी बचत होणार आहे. तसेच वाहतुकीचा ताण कमी होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठा फायदा होणार आहे.

**पर्यटन आणि मत्स्यव्यवसायाला नवे बळ**

रेवदंडा, चौल, कोर्लई, काशीद, मुरूड-जंजिरा यांसारख्या जागतिक स्तरावर ओळखल्या जाणाऱ्या पर्यटनस्थळांपर्यंत पोहोचणे अधिक सोपे होणार आहे. त्यामुळे पर्यटकांची संख्या वाढून हॉटेल व्यवसाय, होमस्टे, रेस्टॉरंट, स्थानिक विक्रेते आणि पर्यटनाशी निगडित विविध व्यवसायांना मोठी चालना मिळेल.

मत्स्यव्यवसायासाठीही हा पूल वरदान ठरणार असून, मच्छीमारांना जलद वाहतुकीची सुविधा उपलब्ध होणार आहे. मत्स्य उत्पादनांची बाजारपेठेत जलद पोहोच होऊन आर्थिक उलाढालीत वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

**रोजगार आणि गुंतवणुकीच्या संधी वाढणार**

महामार्ग आणि पुलांच्या उभारणीमुळे किनारी भागात नवीन उद्योग, पर्यटन प्रकल्प आणि व्यावसायिक गुंतवणूक आकर्षित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे स्थानिक युवकांसाठी रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील. कोकणच्या आर्थिक विकासाला गती देणारा हा प्रकल्प भविष्यातील विकासाचा पाया ठरणार असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.

**२०२८ पर्यंत नागरिकांची प्रतीक्षा संपणार?**

एमएसआरडीसीच्या देखरेखीखाली आणि अशोका बिल्डकॉन लिमिटेडच्या माध्यमातून सुरू असलेले हे काम नियोजनानुसार पूर्ण झाल्यास २०२८ अखेरपर्यंत रेवदंडा खाडीपूल वाहतुकीसाठी खुला होऊ शकतो. त्यामुळे अनेक वर्षांपासून चर्चेत असलेला हा प्रकल्प प्रत्यक्षात साकार होऊन कोकणातील प्रवास अधिक वेगवान, सुरक्षित आणि आधुनिक होणार आहे.

कोकणच्या विकासाला नवे पंख देणारा, पर्यटनाला चालना देणारा आणि नागरिकांचा प्रवास सुलभ करणारा रेवदंडा खाडीपूल हा केवळ दोन किनाऱ्यांना जोडणारा पूल नसून संपूर्ण किनारपट्टीच्या आर्थिक प्रगतीचा सुवर्णसेतू ठरणार आहे.

# संजय दिना पाटील यांच्या पाठपुराव्याला यश, भांडुप स्टेशन परिसर होणार मोकळा, बेस्ट चौकीच्या पुनर्बांधणीचे भूमिपूजन संपन्न

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / प्रतिनिधी** – भांडुप रेल्वे स्थानक मार्गावरील वाहतूक कोंडी, नागरिकांची गैरसोय व वारंवार घडणाऱ्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर खासदार संजय दिना पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला अखेर यश मिळाले आहे. स्टेशन रोडच्या मध्यभागी असलेली बेस्ट बस चौकी आता पर्यायी जागेवर हलविण्यात येत असून तिच्या पुनर्बांधणीचे भूमिपूजन नुकतेच संपन्न झाले. या निर्णयामुळे भांडुप स्टेशन परिसर अधिक प्रशस्त, सुरक्षित व नागरिकांसाठी सुलभ होणार आहे.

भांडुप रेल्वे स्थानक मार्गावरील बेस्ट बस चौकीमुळे अनेक वर्षांपासून वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत होती. याशिवाय या ठिकाणी वारंवार अपघात घडत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचाही



प्रश्न निर्माण झाला होता. गतवर्षी झालेल्या भीषण अपघातात चार नागरिकांना आपला जीव गमवावा लागला होता. या गंभीर परिस्थितीची दखल घेत खासदार संजय दिना पाटील यांनी प्रशासन, पालिका व बेस्ट अधिकाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करून चौकीसाठी पर्यायी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी लावून धरली होती. डीपीडीसीच्या बैठकीपासून प्रत्यक्ष पाहणीपर्यंत प्रत्येक स्तरावर पाठपुरावा करत त्यांनी प्रशासनाला या प्रश्नाच्या कायमस्वरूपी समाधानासाठी भाग पाडले. त्यांच्या पुढाकारामुळे पालिकेने नवीन जागेची निवड करून ती बेस्ट चौकीसाठी उपलब्ध करून दिली असून खासदार निधीतून या चौकीची उभारणी करण्यात येणार आहे.

नवीन चौकीचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याच्या मध्यभागी असलेली विद्यमान बेस्ट चौकी हटविण्यात येणार आहे. त्यामुळे स्टेशन परिसरातील अडथळे दूर होऊन नागरिकांना ये-जा करण्यासाठी अधिक मोकळी जागा उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, या ठिकाणी असलेली पोलीस बीट चौकीदेखील लवकरच पर्यायी जागेवर हलविण्यात येणार असल्याची माहिती खासदार संजय दिना पाटील यांनी दिली. त्यामुळे संपूर्ण स्टेशन परिसर मोकळा होऊन पादचारी व वाहनचालकांना मोठा दिलासा मिळणार आहे. या विकासकामाच्या भूमिपूजन सोहळ्यास शिवसेना पक्षाचे विभाग प्रमुख रमेश कोरगावकर, नगरसेवक सुरेशजी शिंदे, नगरसेविका दिपमाला बडे, राजोल संजय पाटील, भांडुप पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन चव्हाण , विक्रोळी बेस्ट आगाराचे व्यवस्थापकीय प्रमुख अर्जुन मांजरेकर तसेच शिवसेनेचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. स्टेशन परिसरातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या या प्रश्नाला मार्गी लावल्याबद्दल नागरिकांनी खासदार संजय दिना पाटील यांचे विशेष आभार व्यक्त केले असून, त्यांच्या प्रभावी पाठपुराव्यामुळे भांडुपकरांच्या दैनंदिन प्रवासातील मोठा अडथळा दूर होत असल्याची भावना व्यक्त केली.

# पनवेल महापालिकेचे विरोधीपक्षनेते अरविंद म्हात्रे यांचा पदाचा राजीनामा

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर):** पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते अरविंद पुंडलिक म्हात्रे यांनी आपल्या पदाचा तडकाफडकी राजीनामा दिला असून, यामुळे पनवेलच्या राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे. म्हात्रे यांनी आपले अधिकृत राजीनामा पत्र पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील आणि शेतकरी कामगार पक्षाचे (शेकाप) गटनेते केतन भगत यांच्याकडे सुपूर्द केले आहे. या राजीनाम्याला कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीची पार्श्वभूमी असल्याचे बोलले जात आहे.

राजकीय वर्तुळात होत असलेल्या चर्चेनुसार, विधानपरिषद निवडणुकीत झालेल्या अंतर्गत घडामोडींमुळे म्हात्रे यांचा स्वाभिमान जागा झाला आणि त्यातूनच त्यांनी हा राजीनामा देण्याचे पाऊल उचलल्याचे बोलले जात आहे. या सर्व नाट्यमय घडामोडींनंतर अनिकेत तटकरे अखेर बिनविरोध झाले. याच पार्श्वभूमीवर म्हात्रे यांनी तडकाफडकी निर्णय घेतल्याने स्थानिक राजकारणात विविध तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. अरविंद म्हात्रे यांनी पत्रात नमूद केल्याप्रमाणे वैयक्तिक कारणास्तव विरोधी पक्षनेते पदाचा राजीनामा स्वच्छेने सादर केला आहे. या राजीनाम्यानंतर महापौर नितीन पाटील हे आता महापालिका सचिवांशी कायदेशीर आणि प्रशासकीय बाबींवर चर्चा करून अंतिम निर्णय घेणार आहेत. तांत्रिक प्रक्रियेनुसार हा राजीनामा पुढील मंजुरीसाठी कोकण आयुक्तांकडे पाठवला जाऊ शकतो. म्हात्रे यांच्या या निर्णयामुळे शेतकरी कामगार पक्षामध्ये तीव्र नाराजी आणि अस्वस्थतेचे वातावरण पसरले आहे. महाविकास आघाडीतील या अंतर्गत वादामुळे पक्षात चिंतेचे वातावरण असताना, दुसरीकडे महायुतीच्या गोटात मात्र कमालीचा आनंद पाहायला मिळत आहे. म्हात्रे यांनी राजीनामा मागे घ्यावा यासाठी पक्षाकडून प्रयत्न सुरू असले, तरी या संपूर्ण घडामोडींमुळे आगामी काळात पनवेलच्या राजकारणाला कोणती नवीन कलाटणी मिळते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# “एसीमधलं सरकार, रस्त्यावरची जनता” ! 'जनआक्रोश' मोर्चाने वाशी हायवे हादरला

**दैनिक युवक आधार**

**उरण शहर प्रतिनिधी** : पेट्रोल-डिझेलचे दर ऐकूनच चक्कर येतेय आणि सरकार म्हणतंय 'विकास होतोय'... नेमका कुणाचा? असा खडा सवाल आज नवी मुंबईच्या रस्त्यावर घुमला. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या ‘भव्य जनआक्रोश मोर्चा’ने वाशी एक्झिबिशन सेंटर ते वाशी हायवे परिसर अक्षरशःदणाणून गेला, महागाई, बेरोजगारी आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर सुस्त सरकारला जागं करण्यासाठी हजारोंचा जनसागर रस्त्यावर उतरला आणि चक्काजाम झाला.

प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वात खासदार सुप्रिया सुळे, माजी गृहमंत्री जयंत पाटील, आमदार रोहित पवार, खासदार बाळ्या मामा म्हात्रे, रोहिणी खडसे, सक्षणा सलगर हे सर्व नेते एकाच व्यासपीठावर आले आणि सरकारवर तुफान फटकेबाजी केली. "सरकार एसीमध्ये बसून फक्त जाहिरातींचे ढोल बडवतंय, पण इथे सामान्य माणसाच्या घरात चूल पेटवायची की पंखा लावायचा, याचाच हिशोब जुळत नाहीये," असा टोला शशिकांत शिंदे यांनी लगावताच मोर्चेकऱ्यांनी एकच जल्लोष केला.

मोर्चात सहभागी एका काकांनी तर सरकारची अवस्था एका वाक्यात मांडली, "आमचं सिलिंडर रिकामं आणि सरकारचं डोकं रिकामं!" एका गृहिणीने



व्यथा मांडताना सांगितलं, "आता सकाळी उठल्यावर आधी न्यूज बघत नाही, थेट सिलिंडरचा भाव बघते. भाव वाढला की उपास, एवढं सोपं गणित झालंय." तरुणांचा संतापही वेगळाच होता. एका बेरोजगार तरुणाने माईक हातात घेत थेट डायलॉग मारला, "साहेब, आम्ही डिग्री घेऊन घरात बसलोय आणि तुमचे कार्यकर्ते डीलरशिप घेऊन फिरतायत. ही कुठली स्कीम आहे?"

खासदार सुप्रिया सुळे यांनी ‘डबल इंजिन’ सरकारवर निशाणा साधला. "केंद्र आणि राज्याचं इंजिन डबल आहे म्हणतात, पण गाडी मात्र महागाईच्या घाटात बॅक गियरमध्ये जातेय. जनतेच्या खिशाला कात्री आणि भाषणांना मात्र कात्री नाही," असा टोला हाणताच टाळ्यांचा कडकडाट झाला. माजी गृहमंत्री जयंत पाटील म्हणाले, "सरकारच्या तिजोरीत खडखडाट आणि जाहिरातीत मात्र सगळीकडे लखलखाट. हे अर्थशास्त्र आम्हाला नवीनच कळलं."

आमदार रोहित पवार यांनी तरुणांच्या प्रश्नावर सरकारला घेरलं. "पेपर फुटतो, परीक्षा रद्द होते, आणि मग चौकशी समिती नेमली जाते. समितीचा रिपोर्ट येईपर्यंत पोरांचं वय निघून जातं. सरकार म्हणतं 'वेट करा', आम्ही म्हणतो 'आता वेटिंग लिस्ट नको, अपॉइंटमेंट लेटर द्या'," असं म्हणताच युवकांनी घोषणांनी परिसर दणाणून सोडला. "पेट्रोल शंभरी पार करून दोनशेकडे निघालंय, पण सरकारची गाडी अजूनही पहिल्या गियरमध्येच अडकलीय. क्लच सोडा साहेब, जरा पुढे चला!" हा टोला तर विशेष गाजला. प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी स्पष्ट केलं की हा लढा कोणत्याही एका पक्षाचा नाही, तर प्रत्येकाच्या घराच्या बजेटचा आहे. "शेतकऱ्याच्या मालाला भाव नाही, पोराच्या हाताला काम नाही, आणि तरीही सरकार म्हणतं 'ऑल इज वेल'. साहेब, तुमचा टीव्ही बंद करा आणि जरा बाहेर येऊन बघा, 'नथिंग इज वेल'," असा घणाघात त्यांनी केला.

वाशी हायवेवर दोन तास वाहतूक पूर्ण ठप्प होती. 'महागाई हटवा, सरकार हटवा', 'नुसती आश्वासनं नको, ठोस काम दाखवा' अशा घोषणा देत कार्यकर्ते रस्त्यावर ठाण मांडून होते. शेवटी पोलिसांनी शिष्टमंडळाचे निवेदन स्वीकारले आणि मोर्चाची सांगता झाली. एकंदरीत, जाहिरातींच्या झगमगाटात दडलेले सरकार या ‘जनआक्रोश’ची दखल घेतं की स्वतःच्याच विश्वात रमतं, हे पाहणं महत्त्वाचं ठरणार आहे.

# जयंती नगरी-७ मध्ये शिवराज्याभिषेक दिनी गणराज ढोल ताशा पथकाचा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका**

**नागपूर** - जयंती नगरी-७ या बेसा नागपूर येथील रहिवासी सोसायटी मध्ये शनिवार ६ जून रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा राज्याभिषेक सोहळा कार्यक्रम आयोजित केला असून याच कार्यक्रमात सोसायटी मधील नागरिकांनी तयार केलेल्या *गणराज ढोल ताशा* पथकाचा शुभारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत वादनाने केला जाणार आहे.

शनिवार ६ जून २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता आयोजित या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बेसा पिपळा नगरपंचायतचे बांधकाम सभापती श्री. मुकेश काळे,

## सोसायटीमधील राज्यातील पहिले पथक 70 हुन अधिक सदस्य होणार सहभागी वादनाने होणार पथकाचा शुभारंभ

विकासक अभिजित मुजुमदार, हुडकेश्वर पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक अनामिका मिरझापुरे, उपायुक्त समाज कल्याण श्री. मंगेश वानखेडे व इतर मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

गणराज ढोल ताशा पथक हे सोसायटीमधील राज्यातील पहिले पथक असून जयंती नगरी ७ मधील नागरिकांनी मिळून हे पथक स्थापन केले आहे. शिवराज्याभिषेक दिनी या पथकाचा शुभारंभ होत असून शिवरायांचे प्रतिमा पूजन, शिवरायांचा पालखी सोहळा, पथकाचे ढोल ताशा वादन असा नियोजित कार्यक्रम आहे. वक्रतुंड ताल वादनाने ढोल ताशा वादनास सुरुवात होणार आहे. त्यानंतर पहिला हात, भीमरूपी ताल, शिवताल, पाचवा हात, महाकाल ताल व बिंदास ताल वाजवून वादनाची सांगता होणार आहे.

# आयटीआय प्रवेश प्रक्रिया सुरू

**दैनिक युवक आधार**

**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रमुख** : दहावी उत्तीर्ण-अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी सुवर्णसंधी राज्यातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील (आयटीआय) प्रवेश प्रक्रिया सुरू झाली असून दहावी उत्तीर्ण तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी कौशल्याधारित शिक्षण व रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीने प्रवेश अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. राज्यभरातील आयटीआयमध्ये यंदा एकूण 83 व्यवसायांमध्ये सुमारे 1 लाख 55 हजार जागा उपलब्ध आहेत. तसेच उद्योग क्षेत्रातील वाढती मागणी लक्षात घेऊन आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित 652



नवीन अभ्यासक्रम तुकड्या लवकरच सुरू करण्यात येणार आहेत.

प्रवेशासाठी विद्यार्थ्यांनी Admission. dvet.gov.in या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरावा. अर्ज नोंदणीनंतर नजीकच्या आयटीआयमध्ये जाऊन अर्ज निश्चित करून विकल्प सादर करणे आवश्यक आहे. प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्प्यांबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी समुपदेशन सत्रांचे आयोजन करण्यात येत असून विविध व्यवसाय अभ्यासक्रमांची माहिती दिली जात आहे.

आयटीआयमध्ये प्रवेशित प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रशिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजना लागू करण्यात आली आहे. तसेच दहावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांनी आयटीआय अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर नियमानुसार दहावी उत्तीर्ण समकक्षता प्रमाणपत्र मिळण्याची सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे रोजगार, स्वयंरोजगार आणि उच्च शिक्षणाच्या संधींसाठी आयटीआय हा प्रभावी पर्याय ठरत आहे.

# महावितरण 21 वा वर्धापन दिनानिमित्त विशेष

## प्रगतीचा प्रकाश, समृद्धीचा ध्यास: महावितरणच्या गौरवशाली प्रवासाची 21 वर्षे

**दैनिक युवक आधार**

**नागपूर सतीश कडू संपादक विभाग** : दोन दशकांचा गौरवशाली प्रवास महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासात ज्या घटकाने सर्वात महत्त्वाची भूमिका बजावली आहे, ती म्हणजे 'महावितरण' 2005 मध्ये महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या पुनर्रचनेतून उदयाला आलेल्या महावितरणने गेल्या 21 वर्षांत एक अत्यंत खडतर पण तितकाच प्रेरणादायी प्रवास केला आहे. आज जेव्हा आपण या प्रवासाकडे पाहतो, तेव्हा केवळ एका कंपनीची प्रगती दिसत नाही, तर महाराष्ट्राच्या सामाजिक, औद्योगिक आणि कृषी क्षेत्राच्या उत्थानाची एक महागाथा समोर येते. 21 वर्षांचा हा टप्पा म्हणजे महाराष्ट्राच्या उज्वल भविष्याचा पाया अधिक भक्कम झाल्याची साक्ष आहे.

पायाभूत सुविधांचे जाळे आणि तंत्रज्ञानाची जोड : महावितरणचा हा प्रवास केवळ वीज पोहोचवण्यापुरता मर्यादित नव्हता, तर ती एक तांत्रिक क्रांती होती. सुरुवातीच्या काळात जुन्या आणि कालबाह्य वीज वाहिन्यांचे जाळे होते, ज्यामुळे वारंवार वीजपुरवठा खंडित होत असे. महावितरणने आधुनिक तंत्रज्ञानाचा अंगीकार करून हे चित्र पूर्णपणे बदलले आहे:

- अद्ययावत प्रणाली आणि ऑटोमेशन: रिअल-टाइम मॉनिटरिंग आणि त्वरित फॉल्ट डिटेक्शनसाठी अद्ययावत प्रणालीचा वापर करण्यात आला आहे.
- स्मार्ट मीटरिंग: वीज वापराच्या अचूक नोंदीसाठी आणि ग्राहकांच्या सोयीसाठी स्मार्ट मीटर्सचा मोठ्या प्रमाणावर विस्तार करण्यात आला आहे.
- पायाभूत सुविधा: हजारो नवीन उपकेंद्रे आणि ट्रान्सफॉर्मर्सच्या उभारणीतून वितरण क्षमता अनेक पटींनी वाढली आहे.

कृषी क्षेत्राला नवा आधार: 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी': महाराष्ट्राचा कणा असलेल्या शेती क्षेत्राला दिवसा वीज देणे, हे अनेक वर्षांपासूनचे एक मोठे आव्हान होते. महावितरणने 'मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.०' च्या माध्यमातून या आव्हानाचे रूपांतर संधीत केले आहे. आज हजारो कृषी वाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण झाल्यामुळे लाखो शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. हे केवळ सिंचनासाठीच नव्हे, तर ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला गती देण्यासाठीही एक गेम चेंजर ठरले आहे.

सामाजिक दायित्व: एक संवेदनशील चेहरा: महावितरणने आपल्या सामाजिक जबाबदारीचे भान नेहमीच जपले आहे.

- महिला सक्षमीकरण: सरळसेवा भरतीत 33 टक्के महिला आरक्षण देणारी महावितरण ही देशातील पहिली वीज कंपनी आहे. आज हजारो महिला कर्मचारी तांत्रिक पदे भूषवून लिंगभेदाच्या पलीकडे जाऊन आपली क्षमता सिद्ध करत आहेत.
- अनुकंपा भरती: आपल्या वीरगती प्राप्त किंवा मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना हक्काची नोकरी देऊन, 8 हजारांहून अधिक कुटुंबीयांना आधार देण्याचे काम महावितरणने केले आहे. ही एक अत्यंत संवेदनशील आणि सकारात्मक बाब आहे.

उद्योगांना बळ आणि महाराष्ट्राची आर्थिक प्रगती महाराष्ट्राला 'देशाचे पॉवरहाऊस' म्हणून ओळखले जाते. महावितरणने उद्योगांना 24 तास अखंडित वीज पुरवठा सुनिश्चित करून राज्याला जागतिक गुंतवणुकीचे केंद्र बनवण्यात मोलाची भूमिका बजावली आहे. उद्योगांमधील उत्पादकता वाढल्यामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या आहेत, ज्याचा थेट फायदा राज्याच्या जीडीपीला झाला आहे.

भविष्यातील वाटचाल: हरित ऊर्जा आणि शाश्वत विकास अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वाखाली, महावितरण आता 'ग्रीन एनर्जी' कडे वेगाने वाटचाल करत आहे. 2030 पर्यंत 38 हजार मेगावॅट हरित ऊर्जेसह 45 हजार मेगावॅट विजेची भर टाकण्याचे उद्दिष्ट हे महाराष्ट्राला जगातील शाश्वत ऊर्जेचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज करत आहे. 'शून्य अपघात महावितरण' ही मोहीम राबवून कंपनीने आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेलाही सर्वोच्च प्राधान्य दिले आहे.

महावितरणचा हा 21 वर्षांचा प्रवास हे सिद्ध करतो की, जर ध्येय स्पष्ट असेल आणि कष्टाची जोड असेल, तर आव्हाने ही प्रगतीची पायरी ठरतात. मुख्यमंत्री आणि ऊर्जामंत्री ना. श्री. देवेंद्र फडणवीस तसेच ऊर्जा राज्यमंत्री ना. श्रीमती मेघना बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला आणि अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात महावितरण केवळ वीज वितरण कंपनी न राहता, ती महाराष्ट्राच्या विकासाची एक अखंड ऊर्जा वाहिनी बनली आहे. आजचा हा वर्धापन दिन केवळ एक उत्सव नाही, तर भविष्यातील प्रगतीची नवी जिद्द आहे. येणाऱ्या काळात अधिक आधुनिक, डिजिटल आणि पर्यावरणपूरक महावितरण पाहणे, हे प्रत्येक महाराष्ट्रवासीयासाठी अभिमानास्पद असेल.

**- योगेश विटनकर**
**उपमुख्य जनसंपर्क अधिकारी,**
**प्रादेशिक संचालक कार्यालय,**
**नागपूर.7**

## जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जगद्गुरु संत तुकाराम उद्यानात वृक्षारोपण व परिचय मेळावा उत्साहात संपन्न



**दैनिक युवक आधार**

**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका नागपूर :** जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून जगद्गुरु संत तुकाराम उद्यान, रेशीमबाग मित्र परिवाराच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा तसेच एकमेकांच्या परिचयाचा कार्यक्रम संत तुकाराम उद्यानात मोठ्या उत्साहात आणि उत्स्फूर्त प्रतिसादात पार पडला. यावेळी नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध संस्थांचे पदाधिकारी आणि पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. सुनीलजी काशीकर होते. प्रमुख अतिथी म्हणून नंदनवन भाग संघचालक श्री. अशोकजी बुजोणे, लोकजागृती मोर्चाचे ॲड. रमण सेनाड, डॉ. लीना निकम, डॉ. दीप्ती खानोरकर, ज्येष्ठ प्रचारक श्रीकांतजी देशपांडे, श्री. द्वारकाप्रसाद शर्मा आणि श्री. सुरेंद्र होरे मंचावर उपस्थित होते.

कार्यक्रमात विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करण्यात आले. केवळ वृक्षारोपणावर भर न देता प्रत्येक रोपाच्या संवर्धनाची जबाबदारीही उपस्थितांना देण्यात आली. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित झाली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सक्षम महानगर अध्यक्ष डॉ. मिलिंद हरदास यांनी केले. त्यांनी पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेण्याची गरज व्यक्त केली. डॉ. दीप्ती खानोरकर यांनी योगसाधनेचे महत्त्व विशद करत निरोगी जीवनशैली आणि पर्यावरण यांचा परस्परसंबंध स्पष्ट केला.

पर्यावरण विषयावर मार्गदर्शन करताना लेखिका डॉ. लीना निकम म्हणाल्या की, विकासाच्या नावाखाली होणारी वृक्षतोड अत्यंत चिंताजनक आहे. पुढील पिढीला केवळ संपत्ती किंवा पैसा नव्हे, तर शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि हिरवीगार पृथ्वी देणे हीच खरी जबाबदारी आहे. संत तुकाराम महाराजांच्या 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' या अभंगाचा संदर्भ देत त्यांनी वृक्षांशी जिव्हाळ्याचे नाते जोडण्याचे आवाहन केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांनी आरमार व गडकिल्ल्यांसाठी लाकडाची आवश्यकता असतानाही वृक्षतोडीवर मर्यादा आणून पर्यावरण संवर्धनाचा आदर्श घालून दिला होता, असे सांगत त्या म्हणाल्या की, या महान परंपरेचा वारसा जपणे ही काळाची गरज आहे. कार्यक्रमाला सभापती सौ. ज्योतीताई देवघरे, नगरसेवक श्री. चंद्रकांत खंगार, सौ. मानसीताई सिमले, सौ. सारिकाताई चिंचमलातपुरे, अध्यात्मिक आघाडीचे अध्यक्ष डॉ. श्रीरंग वराडपांडे, महामंत्री श्री. नितीन सिमले, दक्षिण भाजपचे डॉ. अविनाश वासे, विदर्भ दैनिक युवक रोजगारच्या संपादिका सौ. ज्योत्स्नाताई करवाडे यांच्यासह विविध सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

सनातन सांस्कृतिक कला व क्रीडा परिषदेच्या वतीने उपस्थितांना वृक्षांचे वाटप करण्यात आले. तसेच केशव प्रभात शाखेचे स्वयंसेवक, रेशीमबाग मित्र परिवार, जगदंबामाता देवस्थान आणि योगाभ्यासी मंडळाच्या सदस्यांची उपस्थिती उल्लेखनीय ठरली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संदीप वाघ, अनंत बैतुले, रमेश महाजन, अतुल तिजारे, प्रवीण घुले, प्रदीप मरोतकर, दत्तराज श्रीरंग, श्रीकांत इरुटकर, आनंद पांढरे आणि संपूर्ण कार्यकर्त्यांच्या चमूने विशेष परिश्रम घेतले.कार्यक्रमाचे सुबक आणि प्रभावी सूत्रसंचालन श्री. सुधीर सांगोळे यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित प्रत्येकाचा वृक्ष भेट देऊन सन्मान करण्यात आला. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणारा आणि सामाजिक ऐक्य दृढ करणारा हा उपक्रम सर्वांच्या स्मरणात राहणारा ठरला.

## साबीर शेख

### "राजकारणाची जाण... समाजकारणाची ओढ... आणि माणुसकीचा सेतू!"



समाजात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात, ज्यांची ओळख केवळ नावापुरती मर्यादित राहत नाही...तर त्याच्या विचारांची उंची, कृतीची प्रगल्भता आणि माणसांशी जोडलेली नाळ हीच त्याची खरी ओळख ठरते. असेच एक बहुआयामी व्यक्तिमत्त्व म्हणजे साबीर शेख.

"हम सब एक है" या भावनेला कृतीत उतरवणारा, मतभेद असले तरी मनभेद होऊ नयेत ही भूमिका सातत्याने जपणारा माणूस म्हणजे साबीर शेख.

राजकारणाची सर्वांगीण जाण असली तरी त्याला केवळ सत्तेचा किंवा चर्चेचा विषय न मानता, समाजाच्या बदलासाठी ते प्रभावी माध्यम असू शकते हा व्यापक दृष्टिकोन बाळगणारा अभ्यासू व्यक्ती म्हणजे साबीर शेख. समाजकारणाकडे पाहताना जात, धर्म, पंथ किंवा विचारसरणीच्या चौकटीत न अडकता, सामाजिक सलोखा, संवाद आणि परस्पर सन्मान ही मूल्ये जपणारा संवेदनशील चेहरा म्हणजे साबीर शेख.

साबीरच्या व्यक्तिमत्त्वात एक वेगळाच समतोल दिसतो... विचारांत परिपक्वता, शब्दांत संयम, मैत्रीत निस्वार्थीपणा आणि सामाजिक बांधिलकीत तो सातत्य जपतो.

काही माणसं स्वतःसाठी जगतात,
तर काही माणसं समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण करतात...साबीर, तू निःसंशय दुसऱ्या प्रवाहातील व्यक्ती आहेस. तुझ्या विचारांची समृद्धी, माणसं जोडण्याची हातोटी आणि समाजहितासाठीची तळमळ अशीच वृद्धिंगत होत राहो, हीच सदिच्छा आणि वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा! तुला उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य, यश, सन्मान आणि समाजहितासाठी अखंड कार्य करण्याची ऊर्जा लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

**: गुरुनाथ विजया रामचंद्र साठेलकर**

## चर्मकार,दिव्यांग,मागासवर्गीय निराधारांसाठी उपजीविकेचा आधार ; विघ्न संतोषी विरोधकांची खट्याळगीरी

### पालिकेच्या संवेदनशील कार्य निर्णयाचे सर्वत्र कौतुक व स्वागत..



**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** समाजातील जेष्ठ नागरिक, गरीब-गरजू, दिव्यांग, चर्मकार समाजातील बांधव, मागासवर्गीय आणि निराधार घटकांना सन्मानाने उपजीविकेचे साधन उपलब्ध व्हावे या संवेदनशील भावनेतून नवीन पनवेल येथील शिवा कॉम्प्लेक्स, दैनिक बाजार आरक्षित क्षेत्रालगतच्या गणेश मार्केट भूखंड सेक्टर-१२ परिसरात काही दिव्यांग व्यावसायिकांना रोजगारासाठी छोटेखानी स्टॉल तसेच वाचनालयाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. दिव्यांग विकास आघाडीच्या माध्यमातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे अनेक कुटुंबांना आर्थिक आधार मिळाल्याने समाधान व्यक्त होत आहे.

सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाच्या भूमिकेतून राबविण्यात आलेल्या या स्तुत्य उपक्रमाला नागरिकांकडून मोठा प्रतिसाद मिळत असताना काही विघ्नसंतोषी घटकांनी कायद्याच्या आडून प्रशासनाच्या सकारात्मक प्रयत्नांवर प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. मात्र दिव्यांगांच्या आयुष्यातील संघर्ष समजून घेणाऱ्या नागरिकांनी अशा भूमिकेवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

उपजीविकेसाठी झटणाऱ्या दिव्यांग बांधवांच्या तोंडचा घास हिरावून घेण्याचा कोणताही प्रयत्न समाज मान्य करणार नाही, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे. शहरातील मोठमोठ्या अतिक्रमणांकडे दुर्लक्ष करून केवळ समाजोपयोगी उपक्रमांवर आक्षेप घेण्याच्या प्रवृत्तीवरही टीका होत आहे.

दरम्यान, शहर अधिक सुरक्षित, स्वच्छ, सुंदर आणि नियोजनबद्ध करण्यासाठी महापालिका आयुक्त, महापौर, सभागृहनेते, सहाय्यक आयुक्त, प्रभाग अधीक्षक आणि अतिक्रमण विभाग सातत्याने विशेष मोहिमा राबवत आहेत. विविध भागांमध्ये नियमित कारवाया करून शहर विकासाचा वेग कायम ठेवला जात असल्याची दखल पनवेलकर घेत आहेत.

दिव्यांग, मागासवर्गीय आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी आवास, रोजगार, शिक्षण, आरोग्य, विविध योजना आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या प्रशासनाच्या निर्णयांचेही नागरिकांकडून स्वागत होत आहे. विशेषतः सहाय्यक आयुक्त ,प्रभाग अधिकारी डॉ. रुपाली माने यांच्या नेतृत्वाखाली शहरातील अस्वच्छता, दुर्गंधी आणि अनियंत्रित व्यवसायांवर करण्यात येणाऱ्या कारवाईचे नागरिकांकडून कौतुक होत आहे.

समाजातील वंचित, उपेक्षित आणि दिव्यांग घटकांना आधार देणाऱ्या या मानवीय दृष्टिकोनाचे जतन करणे ही काळाची गरज असून,

सामाजिक न्यायाची भावना जपणाऱ्या प्रशासनाच्या कार्याबद्दल नागरिकांमध्ये विशेष कृतज्ञतेची भावना निर्माण झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## प्रभारी मुख्याध्यापक पदावरून सौं खंडाईत पायउतार सौ. डा.बारई मुख्याध्यापक पदी रुजू



**दैनिक युवक आधार**

**भंडारा भावेश धंधुकीया जिल्हा प्रतिनिधी** : राणी लक्ष्मी बाई कन्या विद्यालय लाखनी येथे मुख्याध्यापक पदावर पुनश्च सौ . डा.मीराताई बारई रुजू झाल्याबद्दल राष्ट्रीय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. उदय राजहंस यांनी त्यांचे स्वागत केले.

राष्ट्रीय शिक्षण संस्था येथील पदाधिकाऱ्यांमधील वादावर पडदा पडला . संस्थेची सूत्रे डॉ . उदय राजहंस, शिवलाल. रंहागडाले, ॲड. होमेश्वर रोकडे या त्रिमूर्तींच्या हाती आली . सौ डा.मीराताई बारई यांनी चार ते साडेचार वर्ष सतत राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालय प्रगतीच्या दिशेने नेण्याचा प्रयत्न केला. एक यशस्वी मुख्याध्यापिका म्हणून त्यांचे नाव चर्चेला जाऊ लागले असतानाच. त्यांच्या प्रभारी मुख्याध्यापक पदाचा कालावधी संपुष्टात येताच या विद्यालयातील सेवा कनिष्ठ असलेल्या सुनिता खंडाईत यांना आपणच सेवा जेष्ठ आहोत असा भास झाला व त्यांनी शिक्षणाधिकारी माध्यमिक जि. प .भंडारा यांच्याकडे अर्ज केला. संस्थेने यासंदर्भात सेवा जेष्ठ म्हणून सौ. डा .मीराताई बारई यांच्या मुख्याध्यापक म्हणून प्रस्ताव सादर केला होता. परंतु हा प्रस्ताव विचारात न घेता शिक्षणाधिकाऱ्यांनी घाई गर्दीने निर्णय घेऊन सौ. खंडाईत प्रभारी म्हणून मान्यता दिली होती या या निर्णया संदर्भात सौ . डा.मीराताई बारई यांनी शिक्षण उपसंचालक नागपूर यांच्याकडे अपील केले तब्बल एक महिन्यानंतर अपिलाच्या निकाल सौ डा.मीराताई बारई यांच्या बाजूने लागला. त्यामुळे अखेर सौ. सुनिता खंडाईत यांना प्रभारी मुख्याध्यापक पदावरून पायउतार होण्याची वेळ आली. दहावीचा निकाल लागला असल्यामुळे ऑनलाइन प्रवेश घेण्यासाठी विद्यालयातील मुलींना व पालकांना टी.सी .अभावी विद्यालयात हेलपाटे खाण्याची वेळ मुख्याध्यापक पदाचा आदेश नाही त्यामुळे आली.शिक्षण उपसंचालकांनी तातडीने आदेश देऊन ही त्याची तात्काळ दखल न घेता जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी माध्यमिक यांनी पालकांना विद्यालयात चकरा माराव्या लावल्या. पालकांनी बराच संताप व्यक्त केला असून शिक्षणाधिकारी माध्यमिक यांची आडमुठी भूमिका हा सुद्धा एक चर्चेचा विषय बनला आहे. सौ डा.मीराताई बारई यांनी आज रोजी मुख्याध्यापिका म्हणून पुनश्च पदभार स्वीकारला असून त्यांचे स्वागत संस्था अध्यक्ष डॉ. उदय राजहंस, संस्थापक सदस्य सुरेश कापगते, मनीष वंजारी, अर्पित गुप्ता ,सेवानिवृत्त प्राचार्य अरविंद रामटेके ,लाखनी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रा. नरेश वंजारी यांनी केले. राणी लक्ष्मीबाई कन्या विद्यालय गगन भरारी घ्यावी अशा अपेक्षा यावेळी सर्वांनी व्यक्त केल्या. संस्थेचे उपाध्यक्ष शिवलाल रहांगडाले, कार्यवाह ॲड. होमेश्वर रोकडे, विजुक्ताचे जिल्हा सचिव प्रा. अशोक गायधनी, विलास गायधनी, होमेश्वर गोमासे आदींनी अभिनंदन केले आहे.